अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

## गुजरातचा आरसीबीवर ११ धावांनी विजय...

**मुंबई** : महिला आयपीएलमध्ये आज गुजरात आणि आरसीबी यांच्यात सामना सुरु आहे. या सामन्यात गुजरातने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. गुजरातची सलामी फलंदाज सोफिया डंकले हिने विस्फोटक फलंदाजी केली. तिने अवघ्या १८ चेंडूत अर्धशतक झळकावलं. हे वुमन्स आयपीएलमधील सर्वात वेगवान अर्धशतक होय. सोफिया डंकले हिच्या विस्फोटक फलंदाजीच्या



जोरावर गुजरातने निर्धारित २० षटकात २०२ धावांचा डोंगर उभारला. सोफियाने प्रथम फलंदाजी करताना २८ चेंडूत ११ चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने ६५ धावांचा पाऊस पाडला. सोफियाने अवघ्या १८ चेंडूत अर्धशतक झळकावले होते. सोफियाने या डावात २३२ च्या स्ट्राईक रेटने धावा चोपल्या. याआधीच्या दोन सामन्यात सोफियाची बॅट शांत होती. पण आज आरसीबीविरोधात सोफियाने धावांचा पाऊस पाडला. सोफिया डंकले शिवाय हरलीन देओल हिनेही दमदार प्रदर्शन केले. हरलीन देओलने ४५ चेंडूत ६% धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान हरलीन देओल हिने ९ चौकार आणि एक षटकार लगावला. त्याशिवाय एश्ले गार्डेनर, दयालन हेमलता आणि सभ्भीनेनी मेघना यांनी अनुक्रमे १९, १६ आणि ८ धावांचं योगदान दिले. आरसीबीसाठी हीथर नाइट ने २ विकेट घेतल्या. तर मेगान स्कुत आणि श्रेयंका पाटिल यांनी प्रत्येकी एक एक विकेट घेतली.

www.surajyadigital.com | गुरूवार, दि. ०९ मार्च २०२३ | वर्ष : २१ वे ▶ अंक : १५९ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

# बलात्कारी आरोपींना ठोकल्या बेड्या, गाफील पोलिसांच्या आवळल्या नाड्या

## सुराज्यचा तडाखा | तीन अधिकाऱ्यांसह एक पोलीस कर्मचारी निलंबित

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**बलात्कार पिडीत मुलीवर तिच्याच घरात घुसून तिच्यावरच बलात्कारी आरोपींनी केलेल्या खुनी हल्ल्याला 'सुराज्य'ने वाचा फोडताच बार्शी पोलिसांना जबरदस्त तडाखा बसला असून आरोपींना तर बेड्या पडल्याच. शिवाय या प्रकरणात गाफील राहणाऱ्या पोलिसांच्याही नाड्या आवळल्या गेल्या आहेत. कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी बार्शी शहर आणि तालुका पोलीस ठाण्यातील मिळून एकूण तीन अधिकाऱ्यांसह एका पोलीस कर्मचाऱ्याला निलंबित केले आहे. न्यायालयानेही आरोपींना १४ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.**


अस्सल सोलापुरी
सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड
8 मार्च महिला दिवस
जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
www.surajyadigital.com | बुधवार, दि. ०८ मार्च २०२३ | ▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : १५९ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८+१६

पहिल्या दिवशी बलात्कार, दुसऱ्या दिवशी सत्तूरने वार

▶▶ बार्शी शहर पोलीस गाफील राहिले ▶▶ मोकाट आरोपींनी पिडितेलाच मारले

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

इयत्ता बारावीमध्ये शिकणारी १७ वर्षांची मुलगी. ट्युशन संपवून घरी जात असताना मोटारसायकलवरून पाठलाग करणाऱ्या दोघांपैकी एकाने अडवून तिच्यावर बलात्कार केला. त्याची फिर्याद दाखल होऊन चोवीस तास उलटल्यानंतर पुन्हा त्याच दोन आरोपींनी पिडितेच्या घरात घुसून तिच्यावर सत्तूर आणि कोयत्याने वार करत तिच्यावर खुनी हल्ला केला. त्याची दुसरी फिर्यादही दाखल झाली. पहिली फिर्याद दाखल झाल्यानंतर आरोपींना अटक करण्यात पोलिसांनी हलगर्जीपणा केल्यामुळे मोकाट फिरणाऱ्या आरोपींनी दुसऱ्या दुसरा गुन्हा केला. पहिला गुन्हा दाखल झाल्यानंतरच तात्काळ पोलिसांनी तत्परता दाखवली असती तर खुनी हल्ल्याची घटनाच घडली नसती, अशी भावना बार्शीकरांमधून व्यक्त होत असून शहर पोलिसांच्या कार्यक्षमतेबद्दल संताप व्यक्त केला जात आहे.

पाठलाग करून अडवले आणि केली बळजबरी
पिडीत मुलगी रविवारी बार्शी येथे ट्युशनसाठी आली होती. ट्युशन संपवून स्कुटीवरून परत गावाकडे जात असताना अक्षय माने आणि नामदेव दळवी या दोघांनी तिचा मोटारसायकलवरून पाठलाग सुरू केला. रेल्वे रूळ ओलांडून कासारवाडीजवळ आल्यानंतर पिडितेच्या स्कुटीला मोटारसायकल आडवी लावून तिला थांबवले. त्यानंतर दोघांपैकी एकाने तिला ओढत नेऊन बाजूच्याच शेतामध्ये तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर दोघेही आरोपी पळून गेले. पिडितेने घरी जाऊन हा प्रकार आईवडिलांना सांगितल्यानंतर त्यांनी बार्शी शहर पोलीस ठाणे गाठून आरोपींविरूध्द फिर्याद दिली. पोलिसांनी भा.दं.वि. कलम ३७६,३५४,३४१,३२३,५०४,५०६,३४ नुसार दोन्ही आरोपींविरूद्ध दि. ५ मार्च रोजी रात्री गुन्हा दाखल केला. तपास महिला फौजदार सारिका गटकुळ करीत आहेत.

घरात घुसून केला खुनी हल्ला
इकडे बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होत असताना तिकडे आरोपी गावात मोकाट फिरत होते. त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे ६ मार्च रोजी रात्री आठच्या सुमारास बार्शी शहर पोलिसांनी बोलावल्यामुळे पिडितेचे आईवडील पोलीस ठाण्यात गेले होते. त्यावेळी पिडीत मुलगी घरी होती. तीच संधी साधून अक्षय माने व नामदेव दळवी यांनी तिचे घर गाठले. तिच्या घरात घुसून तिच्यावर सत्तूर आणि कोयत्याने सपासप वार केले. त्यात तिच्या हाताची दोन बोटे तुटली असून

बार्शी शहर पोलिसांचा हलगर्जीपणा नडला
रविवार दि. ५ मार्च रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास बलात्काराची घटना घडली. पिडितेने दोन्ही आरोपींची नावे बार्शी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद देताना सांगितली

IMPACT

**बार्शी शहर पोलिसांना हलगर्जीपणा भोवला** : या प्रकरणातील पिडीत मुलीवर आरोपींनी बलात्कार केल्याची गुन्हा रविवारी(दि.५ मार्च) रात्री बार्शी शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला होता. त्यानंतर मात्र पोलिसांनी आरोपींना अटक करण्यासंदर्भात कोणत्याही हालचाली केल्या नव्हत्या. त्यामुळे मोकाट फिरणाऱ्या आरोपींनी दुसऱ्या दिवशी म्हणजे बलात्कारानंतर चोवीस तासांनी घरात घुसून पिडितेवर खुनी हल्ला केला. आरोपींना अटक करण्यासंदर्भात बार्शी शहर पोलिसांनी हलगर्जीपणा दाखवल्यामुळेच महिला फौजदार गटकुळे आणि हवालदार माळी यांना निलंबित करण्यात आले.

### तपास पोलीस उपाधीक्षकांकडे

यासंदर्भातील गुन्हा दाखल करून घेण्यास विलंब करणे, पिडितेला तात्काळ वैद्यकीय तपासणीला घेऊन न गेल्याचा ठपका ठेवून बलात्काराच्या गुन्ह्यातील तपासी अंमलदार आणि खुनी हल्ल्याच्या गुन्ह्यातील तपासी अंमलदार यांना निलंबित करण्यात आले आहे. या दोन्ही गुन्ह्यांचा पुढील तपास बार्शी विभागाच्या पोलीस उपाधीक्षकांडे सोपवण्यात आला आहे.

**- शिरीष सरदेशपांडे (पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण)**

**'सुराज्य'ने केला भांडाफोड** : पहिल्या दिवशी बलात्काराचा गुन्हा दाखल झालेला असताना आणि आरोपी निष्पन्न झालेले असतानाही त्यांना अटक करण्याच्या हालचाली बार्शी शहर पोलिसांकडून करण्यात आल्या नाहीत. त्यामुळेच आरोपींनी दुसऱ्या दिवशी पिडितेवर घरात घुसून खुनी हल्ला केला. पहिला गुन्हा दाखल झाल्यानंतर लगेचच आरोपींना बेड्या ठोकल्या असत्या तर दुसरा गुन्हा घडलाच नसता. दुसरा गुन्हा घडण्यास पोलिसांचा निष्काळजीपणाच कारणीभूत असल्याचा भांडाफोड 'सुराज्य'ने बुधवारच्या अंकात केला. त्याची दखल कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी घेतली आणि चौघांना निलंबित केले.

बार्शी शहर पोलीस ठाण्यातील महिला पोलीस उपनिरीक्षक सारिका गटकुळे, हवालदार भगवान माळी, बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक निरीक्षक महारुद्र परजणे, सहाय्यक उपनिरीक्षक राजेंद्र मंगरूळे अशी निलंबित करण्यात आलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे आहेत. बारावीची परीक्षा देणाऱ्या अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिच्यावर बलात्कार केल्याचा गुन्हा बार्शी हर पोलीस ठाण्यात दाखल असून त्याचा तपास महिला फौजदार सारिका गटकुळे यांच्याकडे होता. याच प्रकरणातील आरोपींनी बलात्कार केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी पिडीत मुलीच्या घरात घुसून तिच्यावर सत्तूर व कोयत्याने वार केले होते. त्यात तिच्या उजव्या हाताची दोन बोटे तुटली आहेत. यासंदर्भातील गुन्हा बार्शी तालुका पोलीस ठाण्यात दाखल असून त्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे यांच्याकडे होता. या दोन्ही प्रकरणात दोन्ही पोलीस ठाण्यातील वरील चौघांना बुधवारी निलंबित करण्यात आले.

दरम्यान, या प्रकरणातील आरोपी अक्षय विनायक माने (वय २३) आणि नामदेव सिध्देश्वर दळवी (वय २४, दोघेही रा. बळेवाडी, ता. बार्शी) यांना बार्शी शहर पोलीस ठाण्यात दाखल बलात्काराच्या गुन्ह्यात अटक करण्यात आली असून बुधवारी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना १४ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. बार्शी शहर पोलिसांकडील तपास संपल्यानंतर बार्शी तालुका पोलीस त्यांच्याकडील गुन्ह्यात या आरोपींना अटक करणार असल्याचे पोलीस सूत्रांकडून सांगण्यात आले.

---

### सुरत-चेन्नई ग्रीनफील्डचा प्रश्न पेटला

## भूसंपादन अधिकाऱ्यांना पोलीस संरक्षण

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, बार्शी आणि या तीन तालुक्यातून जाणाऱ्या सुरत चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्गासाठी संपादित करण्यात येणाऱ्या जमिनी आणि दिल्या जाणाऱ्या मोबदल्यावर शेतकरी आक्रमक झाले आहेत. भूसंपादन अधिकाऱ्यांच्या दालनात रोज बाधित शेतकरी येत असल्याने वादाच्या घटना घडत आहेत. हे प्रसंग टाळण्यासाठी आता या प्रकल्पाच्या भूसंपादन अधिकारी अरुणा गायकवाड यांना पोलीस संरक्षण देण्यात आले आहे.

सुरत चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्गासाठी दिल्या जाणाऱ्या मोबदल्यावरून शेतकरी नाराज आहेत. प्रशासनाकडून दिल्या जाणाऱ्या नोटीसेला उत्तर देण्यासाठी भूसंपादन अधिकारी अरुणा गायकवाड यांच्या दालनात गर्दी होत आहे. तर काही ठिकाणी आंदोलन केले जात आहे. दोन दिवसापूर्वी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आले असता बाधित होणाऱ्या तीन तालुक्यातील शेतकऱ्यांची बैठक घेऊन माहिती घेतली मिळणार मोबदला कमी आहे. जादा मिळावा जुन्या कायद्यानुसार जमीन संपादित केली जात आहे. तो कायदा रद्द करावा असे साकडे सर्व बाधित शेतकऱ्यांनी घातले होते. याला पालकमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत या प्रश्न शासनाकडे बैठक लावून योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होत. त्यामुळे विषय निकाली निघाला असताना भूसंपादन अधिकारी अरुणा गायकवाड यांच्याकडून दिलेल्या नोटीसेला हरकत घेण्यासाठी गर्दी होत आहे. प्रकरण पेटल्याने वादाचे प्रकार होण्याची शक्यता असल्याने भूसंपादन अधिकाऱ्यांची सुरक्षा धोक्यात आली आहे. तसे पत्र त्यांनी पोलीस प्रशासनांना जिल्हा प्रशासनाकडून दिल्याने भूसंपादन अधिकारी अरुणा गायकवाड यांना पोलीस प्रशासनाकडून दोन हत्यारी पोलिसाची सुरक्षा पुरवण्यात आली आहे.

## मुलीसोबत अश्लील वर्तन आरोपीला ३ वर्षे सक्तमजुरी

**सोलापूर** : अल्पवयीन मुलीसोबत अश्लील कृत्य करून लज्जास्पद वर्तन करणाऱ्या देवेंद्र शांतता नागुरे (वय ५५ रा. अक्कलकोट) याला ३ वर्षे सक्त मजुरी आणि ५ हजार रुपये दंड अशी शिक्षा विशेष न्यायाधीश कविता शिरभाते यांनी सुनावली.

ती अल्पवयीन मुलगी २८ डिसेंबर २०१५ रोजी शाळेला गेली होती.दुपारी जेवणाच्या सुट्टीत आरोपी देवेंद्र नागुरे हा शाळेजवळ गेला. आणि १० रुपये देतो असे म्हणत तिला आपल्या घरात घेऊन गेला. आणि तिच्याशी असभ्य वर्तन केले होते. यासंदर्भात अक्कलकोट उत्तरच्या पोलिसांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला होता. या घटनेच्या तपास तत्कालीन उपविभागीय पोलीस



अधिकारी कृष्णकांत उपाध्याय यांनी करून आरोपपत्र न्यायालयात दाखल केले होते. न्यायालयाने भादवि कलम ३५४-अ प्रमाणे दोषी धरून आरोपीला शिक्षा सुनावली. या खटल्यात सरकारतर्फे ॲड. प्रकाश जन्नु, ॲड. शीतल डोके तर आरोपीतर्फे ॲड. पी.बी.लोंढेपाटील यांनी काम पाहिले.

## महिला दिनी डॉक्टरने केला महिला डॉक्टरचा विनयभंग

सुराज्य/सोलापूर

सोलापुरातील एका पशुचिकित्सक दवाखान्यात कार्यरत असलेल्या एका महिला डॉक्टरने तेथेच कार्यरत असणाऱ्या एका डॉक्टरांच्या विरोधात विनयभंग, दमदाटी केल्याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

या घटनेची हकिकत अशी की, फिर्यादी या महिला डॉक्टर असून, त्यांच्याच दवाखान्यात कार्यरत असणाऱ्या डॉक्टर बागवान यांनी गेल्या महिनाभरापासून आपणाकडे पाहून अश्लील गाणी लावणे, शेरेबाजी करणे, शरीराला स्पर्श करणे असे प्रकार केले होते.त्यात पुन्हा त्यांनी ६ मार्च रोजी अशाच प्रकारे आपल्याबरोबर वागणूक केल्याने त्या महिला डॉक्टरने जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात डॉक्टरच्या विरोधात विनयभंग व दमदाटी केल्याप्रकरणी तक्रार दिली आहे.घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक पोलीस उपनिरीक्षक पवार करत आहेत.

## प्रत्येक निवासी, कमर्शियल इमारतीत हिरकणी कक्ष

### मुख्यमंत्री शिंदेंची महिला दिनी घोषणा

**मुंबई** : नवीन निवासी आणि कमर्शियल इमारतीत हिरकणी कक्ष असणार आहे. २५० चौ.फूट यासाठी जागा दिली जाईल. त्याचा एफएसआय मोजला जाणार नाही. ही जागा मोफत दिली जाणार आहे, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी विधानसभेत जाहीर केले.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, आपण महिलांसाठी खास हिरकणी कक्ष सुरू केले आहे. त्यापुढे जात आता बांधकाम सुरू असलेल्या इमारतीत २५० चौ. फूट जागा हिरकणी कक्षासाठी दिली जाणार आहे. त्याचा एफएसआय मोजला जाणार नाही. ही जागा मोफत दिली जाणार आहे. हा महत्त्वाचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. प्रत्येक ५० किमी अंतरावर महिलांसाठी खास शौचालय बांधले जाणार आहे. तेथे स्वच्छता ठेवली जाईल. त्याची अंमलबजावणी तातडीने केली जाईल, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले. उद्या उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस हे अर्थसंकल्प सादर करतील. या अर्थसंकल्पात महिलांसाठीही खास योजना असतील. महिलांच्या ज्या काही



समस्या आहेत त्याची यादी महिला आमदारांनी सादर करावी. त्यावर योग्य तो निर्णय घेतला जाईल, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले. तसेच मुख्यमंत्री शिंदे यांनी जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला खास शुभेच्छा दिल्या. या शक्तींचा आदर करूया. त्यांना समानतेचे, बरोबरीचे स्थान देऊया, असे आवाहन करतानाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## दहशत निर्माण करणारा आरोपी तीन जिल्ह्यातून तडीपार

सुराज्य/सोलापूर

लोकांना धमकावून शस्त्रांचा धाक दाखवणे, जबरी चोरी करणे, बेकायदेशीर घरात घुसणे, जनतेच्या संपत्तीचे मोडतोड करून नुकसान करणे तसेच मारहाण करून दहशत निर्माण करणारा सराईत गुन्हेगार सोमनाथ ऊर्फ सोमा सदाशिव गायकवाड (वय-२६, रा.जुना विजापूर नाका,२ नंबर झोपडपट्टी, सोलापूर) याला दोन वर्षासाठी तडीपार करण्यात आले आहे. गायकवाड याला सोलापूर शहर व जिल्हा, उस्मानाबाद जिल्हा तसेच पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातून दोन वर्षासाठी तडीपार केले आहे.याबाबत पोलिसांनी नुकतेच आदेश दिले आहेत.

आगामी काळात विविध जातिधर्माचे सण उत्सव मिरवणुका निघणार आहे.शिवाय महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने शहरात कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये,यासाठी शहरात कायदा व सुव्यवस्था तसेच शांतता अबाधित राहण्याच्या अनुषंगाने सोमनाथ



गायकवाड याला तडीपार करण्यात आले आहे.त्याच्यावर सोलापूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विजापूर नाका, सदर बझार, एमआयडीसी, सलगर वस्ती या पोलीस ठाण्याच्या हद्दीत शस्त्रांचा धाक दाखवणे, जबरी चोरी, घरात घुसून संपत्तीचे मोडतोड करणे, मारहाण करणे, दहशत निर्माण करणे अशा प्रकारचे विविध गंभीर स्वरूपाचे एकूण ७ गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे त्याच्यावर तडीपार करण्याचे आदेश पोलीस उपायुक्त परिमंडळ यांनी दिले.त्यास मंगळवार ७ मार्च २०२३ पासून विजापूर नाका पोलीस स्टेशन कडून ताब्यात घेऊन, सोलापूर शहर व जिल्हा उस्मानाबाद जिल्हा,तसेच पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातून दोन वर्षाकरिता तडीपार करण्यात आले आहे. याबाबतची माहिती पोलीस निरीक्षक बाळकृष्ण हनपुडे-पाटील यांनी पत्राव्दारे दिली आहे.

---

# पुरोगामी महाराष्ट्रात महिला मुख्यमंत्री केव्हा होणार?

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




एक दिवस सेलिब्रेशन, बाकी वर्षभर गहू, ज्वारी अन् बेसन...

## ● महिला दिनी आ.प्रणिती शिंदे यांचा असाही हुंकार

सुराज्य/सोलापूर

**महिला दिनी 'नारी शक्ती'चे बरेच गुणगान गायिले जाते. या शक्तीने आज कुठली क्षेत्रे पादाक्रांत केलेली नाहीत,असे विचारवंत नेहमीच बोलत असतात. थोडक्यात सांगायचे झाल्यास महिलांनी सारीच क्षेत्रे काबीज करून तिथे आपली मक्तेदारी निर्माण केली आहे पण या शक्तीला अजून काही तरी हवे आहे.तिच्या मनात दडलेली अपेक्षा बुधवारच्या महिला दिनी प्रकट झाली.त्यातून पुरूषप्रधानकीला नक्कीच हादरा बसलेला असणार. संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होऊन जवळपास ६३ वर्ष पूर्ण झाली पण सुसंस्कृत आणि पुरोगामी म्हणवणाऱ्या महाराष्ट्रात अजूनही मुख्यमंत्रिपदी महिला बसलेली नाहीये.प्रस्थापित पुरुष राजकारण्यांच्या वर्मावर बोट ठेवत सोलापूरच्या काँग्रेसच्या आमदार प्रणिती शिंदे यांनी ही खंत विधानसभेत बोलून दाखवली.**



खातेवाटप होताना महिलांना दुय्यम दर्जाची खाती दिली जातात. पण महिलांना अर्थ, नगरविकास, महसूल अशी खाती ज्यादिवशी दिली जातील, किंबहुना महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदी ज्यादिवशी महिला असेल, तोच खरा महिलादिन असेल, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान सभागृहातील सर्वपक्षीय इतर नेत्यांनी महिला आमदारांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले तसेच बुधवारी विधानसभा कामकाजात महिला लोकप्रतिनिधींना प्राधान्य देण्यात आले असून त्यानुसार कामकाज पत्रिकेत सर्वपक्षीय महिला आमदारांच्या लक्षवेधी सूचना चर्चेला ठेवण्यात आल्या होत्या. याच वेळी भाषण करताना शिंदे यांनी आपल्या मनातील भावना बोलून दाखवल्या.

आपल्या देशाला पहिला महिला पंतप्रधान मिळाल्या, जे अजून अमेरिकेलाही जमले नाही. म्हणजेच महिला धोरणात अमेरिका अजूनही मागासलेली आहे. महिला व बालकल्याण जरी पुरुषाला दिले नसेल तरी महिला व बालविकासच महिलेला दिले जाते, अशा गोष्टी नसायला पाहिजेत. पण ज्या दिवशी महिलांना अर्थ, नगरविकास, महसूल किंबहुना मुख्यमंत्रिपद मिळेल, तोच दिवस खऱ्या अर्थाने आम्हा महिलांसाठी महिला दिन असेल, असेही त्या म्हणाल्या.

### फूल भी है,और चिंगारी भी...

महिला समान हक्क मागताहेत. फूल भी हैं और चिंगारी भी हैं... हम भारत की नारी आहे, असे असतानाही जर पुरोगामी महाराष्ट्रात ते हक्क आम्हाला मिळत नसतील तर महिला दिन साजरा करून काय उपयोग आहे? असा सवालही प्रणिती शिंदे यांनी विचारला. लोक काय म्हणतील, हा महिलांच्याबाबतीतला विचार समाजाने दूर सारायला हवा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. आपण महिला धोरण म्हणतो, आर्थिक धोरण किंवा सामाजिक धोरण म्हणतो पण जोपर्यंत त्यांच्या बाबतीतलं मानसिक धोरण आपण बदलत नाही तोपर्यंत सरकारने केलेले कायदे फक्त कागदावरच राहतील, ते प्रत्यक्षात येणार नाही, असे त्यांनी नि:क्षून सांगितले.

### ठराव मांडणार

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर आधुनिक महिला धोरण तयार करण्याचा ठराव मांडणार आहेत. राज्य सरकारचे १९९४, २००२, २०१४, २०१९ चे प्रस्तावित धोरण तसेच २००१ चे राष्ट्रीय महिला धोरण यांचे एकत्रीकरण करून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक महिला धोरण तयार करण्याबाबत सरकारी पातळीवर उपाययोजना कराव्यात, अशा आशयाचा हा ठराव असणार आहे,असेही त्यांनी सूचित केले.

# तृणमूलची घसरण...

नुकत्याच झालेल्या पोटनिवडणुकीत प.बंगालच्या एका विधानसभा मतदार संघात सत्ताधारी पक्ष असलेल्या तृणमूल काँग्रेसला मोठा धक्का बसला.तिथे या पक्षाचा उमेदवार पराभूत झाला आणि तिथे काँग्रेस विजयी झाली. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी उर्फ दीदी यांना दणका दिलेला मतदार संघ आहे, सागरदिघी. तिथे काँग्रेसच्या उमेदवाराचा साधारण २४ हजार मताधिक्याने विजय झाला.हा पराभव म्हणजे तृणमूलची घसरण सुरू झाली असून तिथे काँग्रेसला पुन्हा अच्छे दिन येणार,असे मानले जात आहे.येथे काँग्रेसच्या उमेदवाराचा साधारण २४ हजार मताधिक्याने विजय झाला. विशेष म्हणजे उमेदवाराच्या पराभवासह येथे तृणमूल काँग्रेसच्या मतांची टक्केवारीदेखील घटली. या मतदारसंघात ६० टक्क्यांपेक्षा अधिक मतदार मुस्लीम समाजातील आहेत. या निवडणुकीत मुस्लीम मतदारांनी बॅनर्जी यांना पाठ दाखवल्याचे आढळून आले आहे. याच कारणामुळे पराभवाचे कारण शोधण्यासाठी तसेच पक्ष नेमका कोठे चुकला यासाठी ममता बॅनर्जी यांना पाच सदस्यीय समितीची स्थापना करावी लागली. या समितीच्या माध्यमातून पराभवाची कारणे त्या शोधणार आहेत म्हणे. ही समिती पक्षाच्या सागरदिघी येथील पराभवाची कारणे काय आहेत? मुस्लीम मतदार दूर होत आहे का? हे जाणून घेण्याचा प्रयत्न करेल. पश्चिम बंगालमध्ये २०२१ साली विधानसभा निवडणूक पार पडली होती. या निवडणुकीत तृणमूलला मिळालेल्या मतांची टक्केवारी ५०.९५ एवढी होती. मात्र सागरदिघी येथील पोटनिवडणुकीत तृणमूलला फक्त ३४.९४ टक्केच मते मिळाली आहेत. येणाऱ्या एप्रिल महिन्यात पश्चिम बंगालमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा होण्याची शक्यता आहे. असे असताना सागरदिघीमधील पराभव तृणमूलसाठी चिंतेची बाब असल्याचे मानले जात आहे. मुर्शिदाबाद जिल्ह्यात असलेल्या सागरदिघी या मतदारसंघावर २०११ सालापासून तृणमूल काँग्रेसचे वर्चस्व आहे. अगोदर हा मतदारसंघ काँग्रेसच्या ताब्यात होता. २०१९ सालच्या लोकसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसला २६.२३ टक्के मते मिळाली होती. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत हाच आकडा ५०.९५ टक्क्यांवर पोहोचला होता. मात्र आता पोटनिवडणुकीत पुन्हा एकदा तृणमूल काँग्रेसला मिळणाऱ्या मतांमध्ये घट झाली आहे. सागरदिघी मतदारसंघात साधारण ६३ टक्के मतदार हे मुस्लीम समाजाचे आहेत. मात्र याच मतदारसंघात तृणमूलच्या मतांची टक्केवारी घटल्यामुळे अल्पसंख्याक मतदार ममता बॅनर्जी यांच्यावर नाराज आहेत का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. याचाच ऊहापोह या समितीकडून केला जाईल. या पराभावाने केवळ राज्यातच नाही तर केंद्रीय राजकारणातही दीदींना मोठा धक्का बसणार आहे.कारण भाजपला पर्याय म्हणून जी तिसरी आघाडी उभी केली जाणार आहे,त्याच्या प्रमुखपदाच्या त्या प्रबळ दावेदार मानल्या जातात.आघाडीसाठी त्यांनी पुढाकार घेतला होता.त्यात त्यांना फारसे यश आले नाही.दीदींचा कुणाशी जुळवून घ्यायचेच नाही,हा दीदींचा स्वभाव.सारेजण माझ्या दारात आले पाहिजे,असा त्यांचा अट्टाहास.ज्यांची राजकीय जडणघडण काँग्रेसमधून झाली.काँग्रेसच्या जिवावर त्यांनी अनेक पदे उपभोगली. काँग्रेस पक्षाने त्यांना काय दिले नाही? इतके देवूनही त्यांनी काँग्रेस अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांना अपमानास्पद वागणूक दिली.केंद्रीय सत्तेत काँग्रेस खेरीज आघाडी होवू शकणार नाही,हे त्रिवार सत्य असताना काँग्रेस माझ्याकडे चर्चेला आली पाहिजे,असा हट्ट त्यांनी धरला होता.शेवळी काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष आहे.त्या पक्षालाही स्वतःची काही प्रतिष्ठा आहे.दीदींचा थिल्लरपणा पाहून सोनियांनी त्यांचा नाद सोडून दिला. काँग्रेसशिवाय आघाडी होवू शकणार नाही,असे शरद पवार यांनी देखील ठणकावून सांगितले होते पण दीदींच्या स्वभावात बदल झाला नाही.आघाडीसाठी प्रादेशिक पक्षांच्या हायकमांडनी देखील दीदींचा विचार सोडून दिला.आता तर पराभव झाल्याने आघाडीसाठी दीदींचा क्रम मागे पडणार आहे.दीदींची भाषा,त्यांचा थयथयाट काय असतो हे देशाने पाहिजे आहे.त्यांच्या कार्यकर्त्यांच्या दहशत काय असते हेही आज पहायला मिळते.ज्या सर्वधर्म समभावात आणि समानता व एकतेत त्यांची वाढ झाली आहे,त्या दीदींचे कार्यकर्ते भाजपच्या कार्यकर्त्यांचे मुडदे कसे पाडतात.घरे कसे जाळतात हे वारंवार बघायला मिळते. दरम्यान, या विजयामुळे पश्चिम बंगालमधील काँग्रेसचे मनोबल वाढले आहे. येथे काँग्रेस, डाव्या पक्षांची आघाडी यशस्वी होऊ शकते, असा संदेश सागरदिघी मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीतून गेला आहे. त्यामुळे आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तसेच लोकसभा निवडणुकांमध्ये पश्चिम बंगालमधील जनता कोणाच्या पाठीमागे उभी राहील, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे देश पाहण्याऐवजी दीदींना आता स्वतःचे राज्य सांभाळण्याची चिंता समोर आली आहे.



## तुकाराम बीज

# सदेह वैकुंठगमन करणारे संतश्रेष्ठ

**ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस... वारकरी संत परंपरेचा कळसाध्याय ठरलेले संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचे आज तुकाराम बीज आहे. म्हणजेच फाल्गुन वद्य द्वितीया या दिवशी तुकाराम महाराजांनी सदेह वैकुंठगमन केले. संत तुकाराम महाराज सतराव्या शतकातील सामाजिक प्रबोधनाची मुहूर्तमेढ रोवणारे निर्भीड कवी होते. समाजाच्या तळागाळातील लोकांनाही सहज उमजतील, अशा संतरचना तुकारामांनी केल्या. श्रीरामाने शरयू नदीत देह समर्पित केला, तर श्रीकृष्णाने पारध्याचा बाण लागल्यानंतर तोही सदेह अनंतात विलीन झाला. सदेह वातावरणात म्हणजेच पंचमहाभूतांत गेलेले हे दोन्ही अवतार होते; परंतु, मानव असूनही सदेह वैकुंठगमनाचे सामर्थ्य दर्शवणारे संत तुकाराम महाराज हे एकमेव होते. तुकाराम बीजनिमित्त त्यांच्या कार्याचा घेतलेला थोडक्यात आढावा...**

### तुकारामांचे पूर्वायुष्य

संत तुकाराम (ऊर्फ तुकोबा) हे सतराव्या शतकातील एक वारकरी संत होते. त्यांचा जन्म माघ शुद्ध वसंत पंचमीला झाला. पंढरपूरचा विठ्ठल वा विठोबा हे तुकारामांचे आराध्यदैवत होते. तुकोबा एका सुखवस्तू घरात जन्माला आले. त्यांची वंशकुळी मोरे आणि आडनाव अंबिले. तीन भावांमध्ये तुकोबा मधले. थोरला भाऊ थोडासा विरक्त. घर-प्रपंच व्यवस्थित चाललेला असताना या कुटुंबावर एकामागोमाग एक आपत्ती कोसळू लागल्या. आईवडील गेले, थोरल्याची बायको गेली, तुकोबांची नेहमी आजारी असणारी पहिली पत्नी रखमाबाईही गेली. सुस्थितीत असणाऱ्या तुकोबांवर कर्जबाजारी होण्याचा प्रसंग आला. अशा अपघातात सर्वसामान्य माणसे खचून जातात, तुकोबांच्या थोरल्या भावाप्रमाणे घर-संसार सोडून निघून जातात किंवा वैतागून देहत्यागही करतात. इथेच तुकोबांचे थोरपण आहे. तुकोबा हरिचिंतनात निमग्न झाले. आपल्याला झालेल्या जगरहाटीचे दर्शन त्यांनी आपल्या अभंगानुभवातून शब्दबद्ध केले. भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन आसमंतात जनजागृतीचे वादळ निर्माण केले.

### व्यवहाराची थोर शिकवण देणारे तुकोबा

तुकोबांचे अभंग वाचणारा प्रत्येकजण या वादळाने झपाटला जातो. तुकोबा वामनाप्रमाणे सारी भूमी पादाक्रांत करतात आणि आकाशालाही गवसणी घालतात. सागराचा ठाव घेणारी आणि हिमालयाच्या उंचीला स्पर्श करणारी अशी तुकोबांची लोकोत्तर प्रतिभा आहे. चारचौघांप्रमाणे सामान्य जीवन वाट्याला आलेले असूनही तुकोबांनी आपत्तींनी घेरलेल्या जगण्यातील वेगळा अर्थ सर्वांना समजावून सांगितला. व्यवहाराची थोर शिकवण शब्दाशब्दांतून देत असतानाच भक्तीचे सहस्यही उलगडून दाखविले. संसारात वावरत असताना येणाऱ्या सुख-दुःखांना काही अंतरावर कसे ठेवावे, गुंतून न राहताही संसार कसा करता येतो त्याचे मार्गदर्शन तुकोबांसारखे दुसऱ्या कोणी केलेले नाही.

### निर्भीड व साक्षात्कारी संतकवी

तुकाराम महाराज हे साक्षात्कारी व निर्भीड संत कवी



होते. विशिष्ट वर्गाची पारंपरिक मक्तेदारी असलेला वेदार्थ तुकोबांच्या अभंगवाणीतून सामान्य जनांपर्यंत प्रवाहित झाला. संत तुकारामांचे अभंग महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे महान द्योतक आहेत. वारकरी, ईश्वरभक्त, साहित्यिक, अभ्यासक व सामान्य रसिक आजही त्यांच्या अभंगांचा अभ्यास करतात. भागवत धर्माचा कळस होण्याचे भाग्य त्यांना लाभले. महाराष्ट्राच्या हृदयात अभंगरूपाने तुकोबा स्थिरावले आहेत. त्यांच्या अभंगांत परतत्त्वाचा स्पर्श आहे. तुकोबांच्या काव्यातील गोडवा व भाषेची रसाळता अतुलनीय आहे. संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगलेखनाबरोबरच गवळणीही रचल्या.

### दांभिकतेवर शब्दांत वार करणारे संतश्रेष्ठ

खऱ्या अर्थाने संत तुकाराम हे या काळातील लोक संत होते. बहुजन समाजाला जागृत करून देवधर्म यासंबंधी मते लोकांना पटवून देण्यामध्ये ते यशस्वी झाले. देव धर्मातील अनागोंदी त्याचप्रमाणे भोळ्या समजुती प्रयत्नपूर्वक नष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. समाजमनावरील अंधश्रद्धेचा पगडा दूर करून लोकांना नवा धर्म, नवी भाषा देण्याचे काम संत तुकारामांनी केले. संत तुकारामांचे धर्मक्रांतीचे समाज प्रबोधन आजही समाजाला मार्गदर्शक ठरलेले आहे.

### तुकाराम गाथा

संत तुकाराम गाथा म्हणजे बहुजनांची गीता आहे. ज्ञानोबा आणि तुकाराम म्हणजे महाराष्ट्राची संस्कृतिक विद्यापीठे आहेत. त्यांचे साहित्य म्हणजे आध्यात्मिक ज्ञानाचा आधारवड आहे. ज्ञानेश्वरानंतर जनार्दन स्वामी, एकनाथ महाराज, नामदेव आणि त्यानंतर संत तुकाराम यांनी भागवत धर्माची पताका सर्वत्र फडकवली. भागवत धर्माचा कळस ठरलेल्या संत तुकारामांनी बहुजन समाजामध्ये पसरलेली धर्म-कर्मकांडाची जळमटे आपल्या कीर्तनातून पुसून टाकली. अभंगवाणी महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांमध्ये वसली. सामाजिक परिवर्तनाची वादळ सर्वत्र पसरले. जाती-धर्माची उतरंड त्यांनी मोडून काढली. गुलामगिरीची चौकट मोडली. बहुजन समाजामध्ये स्वाभिमान निर्माण केला. संघर्षमय जीवन जगूनही अध्यात्म, भागवत भक्ती, उपदेशाची कास न सोडणाऱ्या तुकारामांनी फाल्गुन वद्य द्वितीयेला सदेह वैकुंठगमन केले.

## टुडेज् ब्लॉग


# प्रदूषित नद्यांची चिंता कुणाला?

**भारतीय संस्कृतीत अनादी काळापासून नद्यांना विशेष महत्त्व आहे. असे मानले जाते की सकाळी पवित्र नद्यांचे स्मरण केल्यास जीवनात यश मिळते. नद्यांनी संस्कृतीच्या विकासात मोठे योगदान दिले आहे. भारतीय संस्कृतीत नद्यांना देवी समतुल्य मानले जाते. गंगेसह अनेक नद्यांचा उगम देवतांशी जोडला गेला आहे. दैवी शक्तींच्या अस्तित्वाचा संबंध नद्यांच्या प्रवाहाशी जोडण्यामागे कदाचित नद्यांचे महत्त्व आपण स्वीकारले पाहिजे हा हेतू असावा. मानवी संस्कृतीचा विकासही नद्यांच्या काठीच झाला. काळाच्या ओघात पाण्याच्या सहज उपलब्धतेमुळे नद्यांच्या काठावरील वसाहतींची रचना दाट होत गेली. हळूहळू या वसाहतींनी मोठ्या शहरांचे रूप धारण केले. पृथ्वीवरील सर्व जलस्रोतांपैकी सत्त्याण्णव टक्के पेक्षा जास्त पाणी खारे आहे आणि बाकीचे बहुतेक हिमनगांच्या रूपात गोठलेले आहेत. या गोठलेल्या जलस्रोतांमधून बहुतांश प्रमुख नद्या उगम पावल्या आहेत. पृथ्वीवरील लोकसंख्येचा मोठा भाग पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेसाठी नद्यांवर अवलंबून आहे. यामुळेच प्राचीन काळी नद्यांच्या प्रवाहाची शुद्धता राखण्याकडे विशेष लक्ष दिले जात असे.**

असं म्हटलं जातं की, ज्योतिषशास्त्राच्या सामान्य समजुतीनुसार नद्यांच्या पाण्यात घाण टाकणाऱ्याला मातृ ऋणाचा शाप मिळतो. लोकांनी नद्यांच्या पाण्यात घाण टाकू नये, ही या श्रद्धेमागची मानसशास्त्रीय वस्तुस्थिती आहे. पण आपण पारंपारिक समज नाकारल्या आणि त्याचा परिणाम असा झाला की ज्या नद्या एकेकाळी पवित्र मानल्या जात होत्या त्या नद्यांमध्ये डुबकी मारल्याने सगळे पाप धुतले जातात अशी अंधश्रद्धा पसरवली. आणि आज याच नद्या इतक्या प्रदूषित झाल्या की यातले पाणी पिण्यायोग्यही राहिले नाही.

तार्किक असण्याच्या आग्रहात परंपरा समजून घेण्याचा प्रयत्न करण्याऐवजी आम्ही आंधळेपणाने त्यांचे अनुसरण करू लागलो. प्राचीन काळी नद्यांवरच्या पुलावरून जाणारे प्रवासी नद्यांबद्दलची श्रद्धा व्यक्त करण्यासाठी नदीच्या पाण्यात काही नाणी टाकत असत. हा तो काळ होता जेव्हा नाणी तांबे किंवा चांदीची होती. तांबे आणि चांदीमध्ये पाणी शुद्ध करण्याचे नैसर्गिक गुणधर्म आहेत. म्हणजेच प्रतीकात्मक दृष्ट्या मानव नदीच्या पाण्याची शुद्धता राखण्याच्या विधीमध्ये अंशतः हातभार लावत असे. पण नंतर याच पाण्यात शिसे किंवा इतर धातूंची नाणी टाकली जाऊ लागली. नद्या आपली पापे धुवून टाकतात ही श्रद्धाही त्यांच्या प्रदूषणाचे कारण बनली. कोरोनाच्या काळात हजारो अर्धे जळालेले किंवा न जळलेले मृतदेह नद्यांमध्ये फेकण्यात आले. यातून नदीचे पाणी किती प्रदूषित झाले असेल याची कल्पना करा.

गेल्या काही दशकांमध्ये नद्यांमधील प्रदूषण झपाट्याने वाढले आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने देशभरातील ६०३ नद्यांच्या प्रदूषणाच्या पाहणीचा अहवाल अलिकडेच प्रसिद्ध केला आहे. नदी प्रदूषणाच्या पाहणीत महाराष्ट्र पहिल्या तर मध्यप्रदेश दुसऱ्या क्रमांकावर आहे. या राज्यात १९ पट्टे आढळले आहेत. बिहार १८ पट्ट्यांसह तिसऱ्या स्थानी आहे. केरळमध्ये १८, कर्नाटकात १%, उत्तरप्रदेशात १%, राजस्थानात १४ तर गुजरामध्ये १३ दुषीत पट्टे आढळले आहेत. खरे तर ही गंभीर चिंतेची बाब आहे कारण त्याचा थेट परिणाम मानवांवर होत आहे. जर नद्या प्रदूषित झाल्या आणि त्या टिकल्या नाहीत तर आपण पृथ्वीवर कसे जगू? आज ज्या प्रकारची परिस्थिती निर्माण झाली आहे आणि बहुतांश नद्या प्रदूषणाचा सामना करत



आपले दिवस मोजत आहेत, हा एक मोठा इशारा आहे. काही काळापूर्वी सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंटने केलेल्या सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की भारतातील बहुतेक नद्यांच्या पाण्यामध्ये शिसे, कॅडमियम, आर्सेनिक, निकेल, क्रोमियम, लोह आणि तांबे यांचे प्रमाण धोकादायक पातळीपेक्षा जास्त आहे.सर्वेक्षणात एकशे सतरा नद्या आणि उपनद्यांमध्ये पसरलेल्या निरीक्षण केंद्रांच्या एक चतुर्थांश नमुन्यांमध्ये दोन किंवा अधिक विषारी धातूंचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले. या प्रदूषणासाठी खाणकाम, भंगार उद्योग आणि विविध धातुकर्म उद्योगांद्वारे पर्यावरणात सोडले जाणारे विषारी धातू कारणीभूत आहेतच, परंतु आपली आधुनिक जीवनशैलीही याला जबाबदार आहे. गंगेसारखी नदी, तिच्या एकूण प्रवाहाच्या सुमारे अडीच हजार किलोमीटर क्षेत्रफळाच्या सुरुवातीलाच प्रदूषित होऊ लागते. उत्तराखंडच्या साडेचारशे किलोमीटरच्या प्रवाहात डझनहून अधिक नाल्यांतून पंचेचाळीस कोटी घन लिटरहून अधिक घाण पाणी गंगेत सोडले जाते. उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड आणि पश्चिम बंगालमध्येही हेच वर्तन या पवित्र नदीला सहन करावे लागत आहे. गंगा ही जगातील दहा सर्वाधिक प्रदूषित नद्यांपैकी एक असल्याचे आढळून आले आहे.आणखी एका अभ्यासात असे आढळून आले आहे की गंगा नदी ही जगातील सर्वात जास्त कचरा समुद्रात वाहून नेणाऱ्या नद्यांपैकी एक आहे. कल्पना करा, जी नदी जीवनदायी आहे असे म्हटले जाते, त्या नदीच्या बाजूने समुद्रात जाणाऱ्या कचऱ्याचा पर्यावरणावर आणि जलचर प्राण्यांच्या आरोग्यावर काय परिणाम होत असेल?

गंगासारख्या नदीची ही अवस्था असेल तर इतर नद्यांच्या दुर्दशेची काय अवस्था असेल. यमुनेत उठणारा पांढरा फेस तिच्या प्रदूषणाची कहाणी सांगतो. एकेकाळी झारखंडची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या दामोदर नदीचे पाणी इतके प्रदूषित झाले आहे की, खुद्द पर्यावरण विभागाच्या म्हणण्यानुसार अनेक ठिकाणी तिचे पाणी पिण्यायोग्य राहिलेले नाही. सुवर्णरेखा नदीला एकेकाळी झारखंडची गंगा म्हटले जायचे, पण आता ती आंघोळीसाठीही लायक राहिलेली नाही. मध्य प्रदेश प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार अमरकंटकमध्ये नर्मदा सर्वाधिक प्रदूषित आहे. अमरकंटक, ओंकारेश्वर यांसारख्या तीर्थक्षेत्रांच्या नर्मदेच्या पाण्यात क्लोराईड आणि विद्राव्य कार्बन डायऑक्साइडची पातळी चिंताजनक बनली आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने देशभरातील ६०३ नद्यांच्या प्रदूषणाच्या पाहाणीचा अहवाल अलिकडेच प्रसिद्ध केला आहे.महाराष्ट्रातील नद्यांच्या अहवालात अतिप्रदुषित गटात चार पट्टे आढळून आले. त्यात कृष्णा नदीचाही समावेश आहे. भीमा, गिरणा, गोदावरी, गोमती, हिरवा, इंद्रायणी, काळू, कोयना या नद्याही अनेक पट्ट्यात प्रदुषित झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. सर्वाधिक ५५ पट्टे महाराष्ट्रातील आहेत. उत्तर प्रदेशातील पूर्वांचलला हिरवेगार ठेवणाऱ्या डझनहून अधिक नद्या मृतावस्थेत आहेत. गोमती, पीलीनदी, मागाई, गदई, तामसा, विशाही, चंद्रप्रभा, सोन नदी आदींची अवस्था बिकट आहे.किंबहुना, पवित्र नद्यांच्या काठावरील काही समारंभ आणि विधी पाण्याच्या प्रदूषणासाठी काही कमी जबाबदार नाहीत, कारण आपण पूजा साहित्य किंवा पूजेत वापरल्या जाणाऱ्या मूर्ती पाण्यात विसर्जित करता येतील या विचाराने नदीत टाकतो. पाण्यात वस्तू टाकून प्रवाहित केल्याने पाप लागणार नाही,असे मानतो. मात्र असे करत असताना आपण हे विसरतो की हे पदार्थ तयार करताना वापरलेली रसायने किंवा काही घटक पाण्याला गुदमरून टाकण्याचे काम करतात. विषारी धातूंबरोबरच नद्यांच्या पाण्यात रासायनिक औषधांमुळेही प्रदूषणात अत्यंत वाईट प्रकारे वाढ होत आहे. जगातील सर्व खंडांतील एकशे चार देशांतील दोनशे अठ्ठावीस नद्यांवर केलेल्या संशोधनात ही बाब समोर आली आहे. या प्रदूषणाचा अप्रत्यक्षपणे करोडो लोकांच्या जीवनावर परिणाम होऊ शकतो.

**- मच्छिंद्र ऐनापुरे**

# अहंकाराचा वारा न लागो....

मी, माझे, मला... अशा स्वयंकेंद्रित भावनांमुळे आज अनेक माणसे श्रेष्ठत्वाची स्पर्धा, द्वेष-अहंकार यांच्या सापळ्यात सापडल्याचे दिसते. अगदी कुटुंबापासून ते सामाजिक राजकीय जीवनातही सर्व क्षेत्रांमध्ये अशा स्थितीत प्रेमभाव, निष्ठा-जिव्हाळा लोप पावल्याचे दिसते. त्याचे मूळ कारण स्वार्थ आणि अहंकारात आहे. भागवत संप्रदायात प्रथेप्रमाणे शेवटी जे अभंग म्हटले जातात, त्यामध्ये बोलिली लेकुरे वेडीवाकुडी उत्तरे । करा क्षमा अपराध महाराज तुम्ही सिद्ध। नाही विचारला (उच्चारिला) अधिकार म्या आपुला । क्षमा अपराध महाराज तुम्ही सिद्ध ।। ' आणि अखेरीस अहंकाराचा वारा न लागो राजसा। माझिया विष्णुदासा भाविकांसी।। अशी आळवणी पांडुरंग रुक्मिणीच्या चरणी केली जाते. या ठिकाणी कीर्तनातील एक दृष्टान्त सांगावासा वाटतो. संत कबीर विठ्ठलाच्या भेटीसाठी पंढरपुराकडे निघाले .



कबीर महाराज म्हणजे नम्रता, विनयशीलता आणि मानवतेचा महामेरू. अहंकाराला जराही थारा नाही. पंढरीकडे जाताना वाटेत एका ठिकाणी एकजण त्यांचा रस्ता अडवितो. कबीर महाराज विनंती करतात, मी पंढरीला विठ्ठलाच्या दर्शनासाठी निघालोय, मला वाट द्या.' ती व्यक्ती दर्पाने म्हणते, मला काही तरी मागितल्याशिवाय आणि काही दिल्याशिवाय कोणीही पुढे जात नाही, तूही काहीतरी माग. ' कबीर महाराज म्हणाले, मी तुम्हाला ओळखले नाही आणि मला काहीही नको आहे.' तेव्हा समोरच्याने मला कसा ओळखत नाही. मी या विश्वाचा निर्माता ब्रह्मदेव आहे.' असे आवाज चढवून दटावले. अखेर बराच वेळ विनंती केल्यानंतर कबीर म्हणाले, मला थोडीशी नम्रता द्या,' तेव्हा ब्रह्मदेव गोंधळले.

आतापर्यंत मला जे मागितले, ते मी दिले; पण नम्रता कशी द्यायची, असे कोडे त्यांना पडले. अखेर ते विष्णूकडे गेले आणि सारा वृत्तान्त कथन केला. तेव्हा विष्णूने त्यांना सांगितले, कबिरांना फक्त हात जोडून नमस्कार करा.' ब्रह्मदेवांना त्याचा मथितार्थ उमजला. ते पुन्हा आले आणि कबिरांना वाकून साष्टांग नमस्कार करणार, तेवढ्यात कबीर महाराजांनी म्हटले, मी फक्त एक तोळा नम्रता मागितली, तर तुम्ही शंभर तोळे नम्रता देताय! ' हे ऐकून ब्रह्मदेव हसले आणि कबीर पंढरीकडे मार्गस्थ झाले. थोडक्यात, सत्तेचा, सेवेचा, श्रीमंतीचा, शिक्षणाचा, पदाचा किंवा कर्तृत्वाचा कोणताही कोणताही गर्व-दर्प-दुराभिमान नसावा. कारण, महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती।'

## जनमानस

# भ्रष्टाचारामुळे सरकारी खात्यांची क्षमता रोडावत आहे. उपाय कधी होणार?

केंद्र सरकारच्या प्रत्येक खात्याची कार्यक्षमता पूर्णपणे वापरली गेल्यास अर्थखात्याकडून महागाई, जीडीपी, तसेच अन्य निर्देशांकांच्या माध्यमातून सरकारची क्षमता दाखविण्याचे जे काम केले जाते, बहुदा त्यापेक्षा चांगल्या निर्देशांकांची आकडेवारी दिसू शकेल. मात्र त्याकरिता सरकारचे विविध पदस्थ अधिकारी, कर्मचारी यांनी आपला खातेनिहाय कारभार पारदर्शक पद्धतीने हाताळतांना स्वतःच्या कारभारावर गैरकारभार, भ्रष्टाचाराचे शिंतोडे उडणार नाहीत याची दक्षता घेण्याची गरज असते. एका मंत्र्याच्या घरात ४० कोटी रुपयांची रोकड सापडते.

एका मंत्र्याच्या मुलाच्या घरातून ८ कोटी रुपयांची रोकड जप्त केली जाते. मनी लॉंडरींग प्रकरणातील एका सनदी अधिकाऱ्याच्या घरातून ३ कोटी रुपयांची रोकड जप्त केली जाते. पाच कोटी रुपयांची कामे देण्याच्या मोबदल्यात एक अधिकारी ४३ लाख रुपयांची लाच स्वीकारताना पकडला जातो. झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांची फसवणूक करून ३८ कोटी रुपयांचा अपहार केला जातो. या अल्पावधीतील घटना सरकारच्या कामकाजात भ्रष्टाचार किती खोलवर रुजला गेला आहे याची प्रचिती समोर आणून देतात. सरकारच्या कामकाजात डिजिटायझेशन केले गेले, टेंडरप्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने सुरू केल्या, सरकारी



अनुदानांची रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा केली जाणे. त्याहीपेक्षा महत्वाचं म्हणजे काळा पैसा, भ्रष्टाचार रोखण्यासाठी नोटबंदी केली गेली. तरीही रोखीतील व्यवहार बंद झालेले दिसत नाहीत. विकासाच्या वेगाचे जे चित्र लोकांसमोर मांडले जाते, त्याच प्रमाणात भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस येत आहेत त्यामुळे विकासाच्या वेगावर भ्रष्टाचाराची छाया पसरलेली नजरेस पडत आहे. हे कुठे तरी थांबले पाहिजे.

ज्या भ्रष्टाचारांची प्रकरणे बाहेर आली त्यांचे स्वरुप जर हिमनगाच्या टोका एव्हढे असेल तर प्रत्यक्ष गैरकारभार व भ्रष्टाचार यांची व्याप्ती किती खोलवर रुजली असावी याचा अंदाज येतो. भ्रष्टाचाराची जी प्रकरणे उघडकीस येतच नाहीत त्यांतील सौद्यांचे प्रमाण थक्क करणारे असू शकते. याविषयी सरकारच्या विश्वासार्ह तपासयंत्रणा तपास करून मिळालेली माहिती कधी जाहीर करू करतील का?

**- स्नेहा राज, गोरेगांव**

## समाजभान

# भारत एक रंगीबेरंगी आविष्कार

काही दिवसांपूर्वी, मी अमेरिकेच्या परराष्ट्र खात्यातील एका महत्वाच्या अधिकाऱ्याबरोबर चर्चा करत होतो. मी त्यांना विचारले, तुम्ही पाकिस्तानला इतके का डोक्यावर घेता? तो देश कसा वागतो याबद्दल सगळे माहीत असून सुद्धा तुम्ही त्यांना अधिकाधिक मदत करत असता, पण इतिहास पहाता, तुम्ही आम्हाला बराच त्रास दिला आहे.

तो अधिकारी उत्तरला, सद्गुरू, प्रश्न आजच्या नेतृत्वाचा नाही आहे. १९४% मध्ये जेव्हा तुम्हाला स्वातंत्र्य मिळाले , तेव्हा आमचा जगात फार कोणाशी संपर्क नव्हता. जो होता तो ब्रिटिशांमार्फत होता. त्यांच्याकडून आम्हाला माहिती मिळत असे. पाकिस्तानकडे एकच धर्म आणि एकच ध्येय असल्याने पाकिस्तान यशस्वी होईल असे स्पष्ट चित्र त्यांनी आमच्यासमोर उभे केले होते. भारतात अनेक घटक आहेत, त्यामुळे भारत स्वतःलाच नष्ट करेल असे त्यांचे मत होते. आपल्याकडच्या विविधतेत असलेल्या ताकदीला लोकांनी कमी मानले; भारत निश्चितच प्रगती पथावर आहे. हा देश कोणत्याही गोष्टींच्या समानतेतून बनलेला नाही, हेच भारताचे वैशिष्ट्य आहे. जेव्हा लोक देश उभा करतात तेव्हा ते नेहमीच



भाषा, धर्म, वंश किंवा वांशिकता यामध्ये समानता शोधतात. त्यांना वाटते की समानतेमुळे ताकद मिळते. पण आपण हा विचार धुडकावून लावला आहे. तुम्ही ५० किलोमीटर जरी इथून दूर गेलात तरी तिथले लोक वेगळे दिसतात, वेगळी भाषा बोलतात, वेगळ्या प्रकारचे कपडे घालतात आणि वेगळे अन्न खातात. भारतामधील भाषा समृद्धी :आपल्या मज्जासंस्थेद्वारा हाताळली जाणारी सगळ्यात गुंतागुंतीची गोष्ट म्हणजे भाषा. कोणतीही भाषा पूर्णपणे विकसित व्हायला अंदाजे हजार वर्षांचा कालावधी जावा लागतो. आपल्या देशात १३०० हून जास्त उपभाषा आणि बोलीभाषा आहेत. जगात इतर कोणत्याही संस्कृतीमध्ये किंवा समाजामध्ये आपल्या इतक्या भाषा निर्माण झाल्या नाहीत. याचा अर्थ आपला मेंदू बराच काळ क्रियाशील राहिलेला आहे. आणि आता आपण तो थिजवू पाहतो आहोत. स्वतःच्या भाषेचा अभिमान असणे खूप महत्वाचे आहे. पण त्याचा दुराग्रह होता कामा नये. आज प्रादेशिक भाषेची परिस्थिती अभिमानाकडून दुराग्रहाकडे वाटचाल करत आहे. एक कानडी म्हण आहे, ज्याचे भाषांतर दोघात भांडण, तिसऱ्याचा लाभ असे होते. आपल्या देशात निश्चितच उत्तम आणि अवघड भाषा आहेत. मात्र दुर्दैवाने, आपण आज इथवर येऊन पोचलो आहोत की इंग्लिश बोलणे हा एकमेव उपाय राहिला आहे. आपण आपापसात जुळवून घेत नसल्याने परकीय भाषेचा फायदा होतो आहे. आज जवळजवळ प्रत्येक ठिकाणी इंग्लिश भाषा वापरली जाते, त्यामुळे हे ही खरे आहे की इंग्लिश भाषा आली नाही तर तुम्हाला अपंग झाल्यासारखे वाटेल. म्हणून मी वेगवेगळ्या राज्यांच्या सरकारला शिफारस करत आहे की प्रत्येक मुलाला दोन भाषा लिहिता वाचता आल्या पाहिजे. त्यातील एक निश्चितपणे मातृभाषा असायला हवी आणि दुसरी भाषा इंग्लिश असायला हवी. कारण इंग्लिश भाषा ही तुमची जगात प्रवेश करण्याची गुरुकिल्ली आहे.

जोडीला अजून दोन तीन बोलीभाषांची ओळख करून देता येईल. ज्यांनी स्थानिक भाषेतून शिक्षण घेतले आहे असे बरेचसे तामिळनाडू, कर्नाटक आणि आंध्र प्रदेश मधील लोक देशातील इतर राज्यात जायला कचरतात, कारण ते तिथली भाषा बोलू शकत नाहीत. आपण सगळेजण जर कमीत कमी पाच भाषा बोलू शकलो तर खूप चांगले होईल. त्यामुळे माणूस बहुमुखी होईल आणि इतर राज्यात प्रवास करायला सक्षम बनेल. परिणामी आपल्या देशात अधिक एकता येईल आणि आपण आपली सांस्कृतिक पाळेमुळे टिकवून ठेवू शकू. भारत जणू एक कॅलिडोस्कोप आहे. हा कॅलिडोस्कोप आकर्षक आणि सुरेख बनवण्याची, त्यामध्ये कोणताही संघर्ष नसण्याची जबाबदारी आपली आहे. आपल्या देशाचे रूप हे असेच आहे आणि ते आपण तसेच ठेवले पाहिजे.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# आसूड मोर्चात सवाल : मोहोळकरांची घरकुले रद्द आणि अनगरची मात्र मंजूर; हा भेदभावकशासाठी ?

✔ सुराज्य/मोहोळ



आम्ही वारंवार मागणी करून आमची घरकुल मंजूर होत नाही मात्र चार महिन्या पूर्वी स्थापन झालेल्या अनगर नगरपंचायतीला ४७० घरकुल मंजूर होतात हा भेदभाव कशासाठी यासाठी आणि अन्यप्रश्नांना विचारण्यासाठी हा आसूड मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. मोहोळचे प्रथम नगराध्यक्ष रमेश बारसकर यांनी या मोर्चाचे आयोजन केले होते.

पुढे बोलताना त्यांनी आमदार यशवंत माने यांनी मोहोळ नगरपरिषदेसाठी आलेला निधी ओरबडून नेला त्यामुळे ते कोणत्या तोंडाने भाषण करणार म्हणून त्यांनी मोहोळ येथे भाषण केले नाही अशी खणखणीत टीका बारसकर यांनी केली. गवत्या मारुती चौक ते शिवाजी चौक पुन्हा नगरपरिषद समोर हा आसूड मोर्चा काढण्यात आला पुढे बोलताना बारसकर म्हणाले.

तुम्ही तालुक्याचे नेते म्हणून घेता काम मात्र अनगरची च कामे करता १५ वर्षापासून तुमच्या हाती सत्ता असताना तुम्ही तालुक्याचा एकही प्रश्न सोडवू शकला नाही.त्यामुळे मी तालुक्याचा नेता नसून नगरचा नेता आहे अशी एकदा घोषणा करा अशी उपरोधिक टीका ही रमेश बारसकर यांनी यावेळी केली.

> ५४० घरकुले नामंजुर झाल्या बद्दल चा असुड मोर्चा मात्र कौतुक त्या मुख्याधिकारी यांचेच याबद्दल आश्चर्य केले जात होते.

मोहोळ शहराचे प्रश्न खऱ्या अर्थाने रमेश बारसकर सोडवीत असल्याने त्यांच्या पाठीमागे असल्याचे पद्माकर अप्पा देशमुख यांनी सांगितले . तर माजी आमदार राजन पाटील यांनी फक्त अनगर चा विकास न करता मोहोळ शहराच्या विकासासाठी प्रयत्न करावेत राष्ट्रवादी मोहोळचे माजी सरपंच आणि राजन पाटील यांचे एकेकाळचे कट्टर समर्थक ब्रम्हदेव भोसले यांनी ही माजी आमदार राजन पाटील यांच्यावर टीका केली. यावेळी आपल्या मागण्याचे निवेदन मुख्याधिकारी डॉ. योगेश डोके यांना देण्यात आले. यावेळी सूत्रसंचालन प्रदेश प्रवक्ते शीलवंत क्षीरसागर यांनी केले. या मोर्चात अंगावर आसूड मारून घेणारा जथ्था या मोचत लक्षवेधून घेत होता. अप्पासाहेब देशमुख, ब्रम्हदेव भोसले, शेखर माने, ॲड. विनोद कांबळे, तनवीर शेख, संगीता पवार, वर्षा दुपारगुडे, अंजली मोहिते, शाहीर हावळे जितेंद्र आष्ठुळ, रवी डोकडे, अतुल क्षीरसागर, सावित्रा एकमल्ले रमेश सनगर सिध्दार्थ एकमल्ले आदीसह अन्य उपस्थित होते.

---

# आधार सिडींगमध्ये मोहोळ तालुका मागे आठ हजार लाभार्थी धान्यापासून वंचित

▶▶ तहसीलदारांचे केला दुकानदार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा अपमान

▶▶ जिल्हा रेशनदुकानदार संघटना आक्रमक, संपाचा इशारा

✔ सुराज्य/सोलापूर




सार्वजनिक वितरण प्रणालीतील सावळागोंधळ थांबण्यासाठी रेशनकार्ड आधार कार्डला संलग्न करणे सक्तीचे केले आहे. मात्र पुरवठा विभागाच्या योजनेला मोहोळ तालुक्यातील पुरवठा विभागाने हरताळ फासला आहे. तब्बल आठ हजार लाभार्थ्यांची नावे डिलीट करण्यात आली असून दुकानदारांनी याबाबतची कागदपत्रे जमा करूनही मोहोळ पुरवठा विभागातील अधिकारी काम करत नाहीत. त्यामुळे गेल्या चार महिन्यांपासून लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहत आहेत. रेशन दुकानदार संघटनेच्या जिल्हाध्यक्षांनी मोहोळचे तहसीलदार प्रशांत बिडसे यांना विचारणा केली असता त्यांनी जिल्हाध्यक्षांचाच अपमान केल्याने रेशनदुकानदार संघटना आक्रमक झाल्या असून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन कारवाईची मागणी केली आहे.

मोहोळ तालुक्यातील एकशे आठ आहेत. मोहोळ तालुक्यात अंत्योदय योजनेचे ३८३ कार्ड असून १२३९ लाभार्थी आहेत. प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांची २०४३ कार्ड असून ६८२७ लाभार्थी आहेत. यांना मोहोळ पुरवठा विभागाच्या माध्यमातून प्रति माणसी तीन किलो गव्हू आणि दोन किलो तांदूळ दिला जातो. या पुरवठा विभागाच्या कारभारावर तहसीलदार यांचे नियंत्रण असते. मात्र शासनाच्या आधार सिंडीगमध्ये मोहोळ तालुक्यातील पुरवठा विभागाने २४१६ कार्ड आधार लिंक नसल्याने डिलिट केली. यावर रेशन दुकानदार संघटनेच्या वतीने पाठपुरावा करत डिलीट केलेल्या लाभार्थ्यांचे आधार कार्ड जमा केले. आधार कार्ड जमा करून चार महिने झाले. तरीही मोहोळ पुरवठा विभाग संबंधित कार्ड आधार लिंक करत नसल्याने तब्बल ८ हजार ६६ लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहले आहेत. दुकानदार आणि लाभार्थी यांच्यात वाद होत असल्याने रेशन दुकानदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुनील पेंटर यांनी मोहोळचे तहसीलदार प्रशांत बिडसे यांच्या कडे तक्रार केली असता तहसीलदारांनी पेंटर यांचाच अपमान केला. या प्रकरणाचा रेशन दुकानदार संघटनेने जाहीर निषेध केला आहे. त्यांच्यावर कारवाई करावी; अन्यथा जिल्ह्यात रेशन दुकाने बंद ठेवण्याचा इशारा दिला आहे.


याबाबत माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता मोहोळच्या तहसीलदारांना संपर्क होवू शकला नाही.

---

# अकोलेकाटी येथे विवाहित तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

✔ सुराज्य/सोलापूर

अकोलेकाटी (ता.उत्तर सोलापूर) येथे राहणाऱ्या निलेश उत्तम गवळी (वय २४) या तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. निलेश गवळी (वय २४) हा विवाहित असून तो पेंटिंग चे काम करीत होता. काल रात्री ११ वाजण्याच्या सुमारास त्याचा मृतदेह अकोलेकाटी ते बीबीदारफळकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेवरील एका झाडाला दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्याला फासातून सोडवून शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.




मयत निलेश गवळी याच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि आई असा परिवार आहे. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार माळी पुढील तपास करीत आहेत.

**सोनके येथे चाकू आणि काठीने मारहाण; पिता-पुत्र जखमी**

सोलापूर- तुम्ही गावात का आला? या कारणावरून चाकू आणि काठीने केलेल्या मारहाणी पिता-पुत्र जखमी झाले. ही घटना सोनके तालुका पंढरपूर येथील गावात मंगळवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

शहबाज मुलानी (वय २६) त्याचे वडील नजीर जमाल मुलानी (वय ५२ दोघे रा. सोनके) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. गावातील दोस्ती पान दुकानाजवळ अडवून त्यांना नवनाथ विलास महानवर, अजय यशवंत महानवर आणि अन्य दोघांनी मिळून चाकू आणि काठीने मारहाण केली.अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

---



## शिवचलेश्वर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये महिला दिन साजरा

✔ **अक्कलकोट** : श्री. शिवचलेश्वर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज मैंदर्गी येथे प्रशालेत जागतिक महिला दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. प्राचार्या जयदेवी उकली यांनी सरस्वती मूर्ती पूजन केले. यावेळी मंचावर महिला शिक्षिका के.एम.आदटराव, आर.एस.भालके, एस.ए.कुलकर्णी, एस.एन.मालगत्ती, जे.एच. नवले, एस.एस.नागुर, गोब्बूर,कांदे तसेच ज्येष्ठ संचालक तूकप्पा (काका)नागुर व पर्यवेक्षक ए.एच. हरवाळकर उपस्थित होते. सर्व महिला शिक्षिकांचा इ.८ वी व ९ वी मधील विद्यार्थींनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केले. रक्षिता दोडमनी ने महिलांचे सामाजिक कार्य व कौटुंबिक जीवनात योगदानाबद्दल माहिती सांगितली.पर्यवेक्षक ए.एच.हरवाळकर यांनी जागतिक महिला दिन साजरा करण्याचे उद्देश व प्राचीन काळापासून ते आजपर्यंत स्त्रियांचे समर्पण व आज सर्व क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीबद्दल माहिती सांगून प्रशालेतील सर्व महिला शिक्षिकांना शुभेच्छा दिले.शेवटी मुख्याध्यापिका उकली यांनी नारी शक्तीच महत्त्व सांगत सर्वांनी आमचा सन्मान केल्याबद्दल आभार मानले.



## जिजामाता कन्या प्रशालेत महिला दिन साजरा

✔ **अकलूज** : शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजच्या जिजामाता कन्या प्रशालेत महिला दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ सुनिता वाघ यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला.कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी सौ तेजश्री नरुळे व अकलूज नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागातील सौ हेमाताई लोखंडे,सौ प्रियांका पाटोळे,शाहीरा शेख,मुनेरा बागवान व गीता सोळंकी तसेच विद्यालयातील सर्व महिला शिक्षकांचा यावेळी सन्मान करण्यात आला. मुलींनी पारंपरिक वेष परिधान करून विविध थोर महिलांच्या व्यक्तिरेखा साकारल्या होत्या. यावेळी मुलींनी समूहनृत्य सादर केले. कु लक्ष्मी गोसावी हिने भाषण केले.मुख्याध्यापिका सौ सुनीता वाघ मॅडम यांनी मुलींना मार्गदर्शन केले. पर्यवेक्षक यशवंत माने-देशमुख यांनी सर्व मुलींना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन इयत्ता सातवी ब मधील मुलींनी केले होते.प्रास्ताविक कु साक्षी ढाकणे हिने केले.सूत्रसंचालन भक्ती जाधव,वैष्णवी अनपट व श्वेता गिरमे हिने केले तर सई शिंदे हिने आभार मानले.



## महिला कर्मचाऱ्यांचा चंदनशिवेंकडून सत्कार

✔ **सोलापूर** : महिला दिनानिमित्त महापालिकेतील महिला कर्मचाऱ्यांचा प्रबुद्ध भारत चौक, मिलिंद नगर येथे जागतिक गटनेते आनंद चंदनशिवे यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. महिला म्हणजे आपला कुटुंबाचे घर चालवण्याचा काम करीत असतात. आपल्या घरातील लहान मुलं असेल त्या मुलांना कसे घडवायचे किंवा गतिमान कसे करायचे हे काम वडिलांच्या हातात नसून घरातील आईच्या हातात आहे. महिला समाज घडवू शकतात, असे चंदनशिवे म्हणाले. यावेळी चंदनशिवे, गणेश पुजारी, सामाजिक कार्यकर्ते श्रीमंत जाधव अविनाश भडकुंबे, चाचा सोनवणे, देविदास चिंचोळकर आदींच्या हस्ते उपस्थित महिलांना फेटा बांधून व मिठाई वाटप करण्यात आली. यावेळी पी बी ग्रुप अध्यक्ष संदीप कापुरे, आदित्य चंदनशिवे मनू काळे, जमादार सिकंदर शेख आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी गौतम शिंदे भीमा मस्के, साईनाथ मस्के, रोहित वाघमारे, पिंटू वाघमोडे लखन चंदनशिवे आदींनी परिश्रम घेतले.



## मनसेच्या स्वयंरोजगार संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

✔ **सोलापूर** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या १७ व्या वर्धापन दिनाचे व जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रोजगार स्वयंरोजगार शहर महिला संपर्क कार्यालयाचे उद्घाटन सोलापुरातील भाजपाचे ज्येष्ठ नेते रामचंद्र जुन्नू व मनसेचे जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे, शहराध्यक्ष जैनोद्दीन शेख, मनविसे राज्य उपाध्यक्ष अमर कुलकर्णी, उपजिल्हाध्यक्ष सत्तार सय्यद, गोविंद बंदपट्टे, जयश्री हिरेमठ, शोभा साठे, करुणा यादव, उपजिल्हाध्यक्ष, निलेश भंडारे, मनोज बचुटे, प्रसाद कुमठेकर, जितू टेंभुर्णीकर, उपशहराध्यक्ष वैभव धोत्रे, गोविंद तांदळे, विद्यार्थी सेनेचे बाळासाहेब सरवदे, शहर उपाध्यक्ष दिनेश हंचाटे, पवन देसाई, ओंकार धोत्रे, महाराष्ट्र पोलीस टाईमचे संपादक उमेश काळे, प्रदीप बंडे, मारुती संगा, सैफन जमखंडी, नितीन पंजाबी आदी उपस्थित होते. लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे यांनी जागतिक महिला दिनाच्या सर्वांना शुभेच्छा देताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे विचार सर्वांपर्यंत पोहचविण्यासह महिला संघटन मजबूत करण्यासाठी प्रयत्न करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

---



## प्रभाग ९ मध्ये जळीतग्रस्तांना शिलाई मशीनचे वाटप

✔ सुराज्य/सोलापूर

प्रभाग क्रमांक ९ दत्तनगर भागातील रेडीमेड कापड उत्पादनाच्या कारखान्यांना आग लागून संपूर्ण कारखाना भस्म झाला होता. कारखान्यांचे मालक मधुकर कुरापाटी व नागनाथ गड्डम यांना पुन्हा आर्थिकदृष्ट्या उभे राहण्यासाठी माजी नगरसवेक नागेश वल्लाळ यांनी महिला दिनाचे औचित्य साधून महिलांना शिलाई मशीनचे वाटप केले. माजी महापौर श्रीकांचना यन्नम यांच्या हस्ते मशीन महिलांना देण्यात आल्या.

वल्याळ यांनी युवक व महिलांना रोजगाराच्या माध्यमातून आर्थिक सक्षम करण्यासाठी मोफत शिवणकाम प्रशिक्षणाचे कार्यशाळा सुरू करण्यात येत असल्याचे सांगितले. यावेळी भाजपा आघाडीच्या अध्यक्षा इंदिराताई कुडक्याल, उपाध्यक्षा सौ.विजयाताई वड्डेपल्ली, माजी नगरसेविका राधिका पोसा, व रामेश्वरी बिरू, सौ. पाटील भगिनी तसेच भाजपा सरचिटणीस जयवंत थोरात, सोलापूर गारमेंट उद्योगाचे अमित जैन व श्री सतीश पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन नागेश सरगम यांनी केले तर वल्याळ यांनी आभार व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी दत्तू पोसा, संदीप वल्याळ, सुकुमार सिध्दम, नरेश दाते, अनिल वंगारी यांचे सहकार्य लाभले.

---

## मोहिते-पाटील महाविद्यालयात पारितोषिक वितरण

✔ सुराज्य/नातेपुते




नातेपुते येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालयामध्ये सन २०२२-२३ चा वार्षिक पारितोषिक वितरण आणि माजी विद्यार्थी स्नेह मेळावा महाविद्यालयाच्या संस्थापक अध्यक्षा तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सिनेट व व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या पद्मजादेवी प्रतापसिंह -मोहिते पाटील आणि युवानेते अखिल भारतीय काँग्रेस समितीचे नवनिर्वाचित सदस्य, सोलापूर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील, उर्वशीराजे मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मजादेवी मोहिते-पाटील होत्या. मान्यवरांच्या हस्ते क्रीडा, गुणवत्ता, राष्ट्रीय सेवा योजना आणि सांस्कृतिक विभागामध्ये विशेष प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष ज्ञानेश राऊत, उपाध्यक्ष बिपिन इंगोले, विद्यार्थी संघटनेचे सचिव हनुमंत वाघमोडे, सागर महाराज बोराटे, राजाभाऊ वाघमोडे, संतोष पोतलकर, प्राचार्या स्वाती कुचेकर, आदींनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा पद्मजादेवी मोहिते-पाटील आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हणाल्या, 'असे मेळावे दरवर्षी आयोजित केली पाहिजे. ज्ञानाची अनुभवाची आणि आत्मसात केलेल्या कौशल्याची आदान प्रदान करणे आवश्यक आहे. असे झाले तर समाज समृद्ध झाल्याशिवाय राहत नाही.'

प्रास्ताविक महाविद्यालयाची प्राचार्य डॉ. चंद्रकांत कोळेकर यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणामध्ये महाविद्यालयाचा लेखाजोखा मांडला. प्राचार्य डॉ. चंद्रकांत कोळेकर यांना अमेरिकेची डिलिट पदवी प्राप्त झाल्याबद्दल, तसेच डॉ. राजेंद्र खंदारे यांनी प्रोफेसर पदी निवड झाल्याने, विविध अभ्यास मंडळावर सदस्य पदी नियुक्ती करण्यात आलेले डॉ. बाळासाहेब निकम, डॉ. सुनीता सूर्यवंशी, डॉ. दत्तात्रय थोरात यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठा कडून पी. एच डी पदवी मिळवली, तसेच प्रा. संभाजी बनसोडे यांनी विद्यापीठ स्तरीय संशोधन प्रकल्प पूर्ण केल्याबद्दल प्रा. शांतीलाल मोरे यांना सोलापूर जिल्हा आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार, तसेच कनिष्ठ विभागातील प्रा. राजेंद्र साठे, प्रा. बापू वाघमोडे, यांनी एम एड पूर्ण केल्याबद्दल तसेच प्रा. सौ. रब्बना शेख यांनी सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल वरील महाविद्यालयातील गुणवंत प्राध्यापकांचा सन्मान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा डॉ बाबासाहेब निकम डॉ राजेंद्र खंदारे यांनी केले प्रा. रज्जाक शेख यांनी आभार मानले. प्रा. दत्तात्रय साळवे प्रा. जगदीशचंद्र मुळीक, प्रा. सौ. पुष्पा भोर, प्रा. सुहास नलावडे, प्रा. श्रीकांत पवार, प्रा. उत्तम सावंत, प्रा. नारायण माने, प्रा. हसन मोगल, प्रा. सोपान सुरवसे, प्रा. नितीन देशपांडे, प्रा. डॉ. दत्तात्रय शहाणे आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

---

# अग्निशामक दलाच्या दोन गाड्यांसाठी सव्वा दोन कोटींचा डीपीसीकडे प्रस्ताव पाठविणार

## महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांची माहिती

✔ सुराज्य/सोलापूर

एमआयडीसीमध्ये वाढत्या आगीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर अग्निशामक दलाच्या दोन गाड्यांसाठी दोन कोटी तीस लाखाचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे पाठविण्यात येत आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी दिली.

अग्निशामक दलाची एक फोम व एक पाण्याची गाडी यासाठी दोन कोटी तीस लाखाचा हा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे पाठविण्यात येत आहे. यामध्ये आवश्यक इतर उपकरणाचाही समावेश राहणार आहे. दरम्यान, वाढत्या आगीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर एमआयडीसी मधील सर्व कारखानदारांनी अग्निशामक यंत्रणा बसविण्यासंदर्भात सूचना दिलेल्या आहेत. त्याचबरोबर कारखान्यात साईड मार्जिन सोडणे



गरजेचे आहे. नियमानुसार सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्याचे सांगण्यात आले आहे. त्याचबरोबर सर्व कारखानदारांनी फायर ऑडिट करणेही आवश्यक असल्याचे महापालिका आयुक्त उगले यांनी स्पष्ट केले.

### वीज वितरणला पत्र देणार

एमआयडीसी मध्ये लागलेल्या आगीचे कारण शर्ट सर्किट असे नेहमी सांगितले जाते. त्यामुळे एमआयडीसीमधील वीज वितरण कंपनीच्या एका डीपीवरून क्षमतेपक्षा अधिक वीज कनेक्शन देण्यामुळे शॉर्टसर्किटचे प्रकार घडत असावेत अशी शक्यता वर्तवली जात आहे. यासंदर्भात योग्य खबरदारी घेण्याबाबत महापालिकेकडून वीज वितरण कंपनीला पत्र देण्यात येणार आहे, असेही यावेळी आयुक्तांनी सांगितले.

### खोदाई बुजविण्यासाठी निविदा काढली

शहरात भूमिगत गॅस- रिलायन्स केबललाईन टाकण्यासाठी खासगी कंपन्यांकडून रस्त्यांची खोदाई सुरू आहे. ही खोदाई बुजविण्यासाठी (रिसरफेसमेंट) महापालिकेकडून निविदा मागविण्यात येणार आहे. कंपन्यांकडून होणारी खोदाई ही नियम व अटीनुसार होत असल्याचे आयुक्तांनी सांगितले.




## चाँद तारा ऊर्दू प्राथमिक शाळेत पारितोषिक वितरण

**सोलापूर** : फिरदोस महिला शिक्षण व समाज सेवा संस्था संचलित चाँद तारा उर्दू प्राथमिक शाळा सोलापूर या शाळेत जागतिक महिला दिवस साजरा करण्यात आला तसेच यावेळी शाळेत वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाले. शिक्षण विस्तार अधिकारी दौलत बेगम नदाफ यांच्या शुभहस्ते शाळेत घेण्यात आलेले विविध स्पर्ध मध्ये यश संपादित केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. जे. बी बागबान तर प्रमुख पाहुणे म्हणून बशीर अहमद बागबान उपस्थित होते. शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले शाळेच्या मुख्याध्यापिका सौदागर गजाला यांनी शाळा व संस्थेची माहिती दिली. सूत्रसंचालन बागवान नेहा यांनी तर यांनी आभार चौधरी यास्मीन यांनी मानले.



## लोकसेवा शाळेत सायकल वाटप

**दक्षिण सोलापूर** : तालुक्यातील मंद्रूप येथील लोकसेवा विद्या मंदिर व क. महाविद्यालयात आज ८ मार्च जागतिक महिला दिन अति उत्साहात साजरा करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविलेले द. सोलापूर पं. स. गटशिक्षणाधिकारी मा. पाथरूट साहेब यांच्या शुभहस्ते सावित्रीच्या लेकि मुलींना सायकल वाटप व महिला शिक्षिका यांचे यथोचित सत्कार करण्यात आले. कर्तबगार महिलांचे सत्कार करणे आणि या दिनाचे औचित्य साधून मुलींना सायकल वाटप करणे हे जि. प. सोलापूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. दिलीप स्वामीसाहेब यांच्या सायकल बँक या संकल्पनेतील नवोपक्रम आपली शाळा योग्य नियोजनाद्वारे राबवली खरोखर हे गौरवास्पद आहे असे गौरवोद्गार अध्यक्षीय मनोगतातून मा. पाथरूट साहेब यांनी व्यक्त केले आणि सर्वांना शुभेच्छा दिले. कार्यक्रमास प्रशालेचे मुख्याध्यापक श्रीधर टेळे, केंद्रप्रमुख शिवाजी जाधव गुरुजी,पर्यवेक्षक मदगोंडा मलकारी, शिक्षण विभागाचे श्री राठोड, माजी ग्रा.पं. सदस्य बसप्पा घाटे, ग्रंथपाल प्रसाद शेंडगे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नंदकुमार टेळे, कला शिक्षक सोमशंकर म्हेत्रे प्राध्यापक, शिक्षक, पालक, माता पालक, आदी मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धानप्पा बगले सर यांनी तर आभार प्रदर्शन सुभाष सुतार सर यांनी केले या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी समस्त प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आदींनी परिश्रम घेतले.




## महिला दिनी युवासेनेचा कष्टकरी महिलांचे सन्मान

**अकलूज** : जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने अकलूज व परिसरातील स्वतः कष्ट करून आपल्या कुटुंबाची उपजीविका करणाऱ्या कष्टकरी महिलांचा सन्मान शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे व युवासेनेच्या वतीने युवा सेना जिल्हा प्रमुख गणेश इंगळे शिवसेना तालुका प्रमुख संतोष राऊत व युवा सेना शहर प्रमुख शेखर खिलारे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला.त्याच बरोबर अण्णाभाऊ साठे चौक अकलूज या ठिकाणी नारळ, फळे ,बांगड्या, भाजी विक्रेते करणाऱ्या महिलांचे सन्मान करण्यात आला.यावेळी युवा सेनेचे उपतालुका प्रमुख दत्ता साळुंखे डॉ निलेश कांबळे शिवसेना अकलूज शहर प्रमुख अनिल बनपट्टे तुषार राऊत पप्पू मिसाळ ई शिवसैनिक युवा सैनिक पदाधिकारी उपस्थित होते.



## दुधनी नगरपरिषदेचे विविध कार्यक्रम

**अक्कलकोट** : दुधनी नगरपरिषदेकडून दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत (DY-NULM) जागतिक महिला दिनानिमित्त मोफत आरोग्य शिबिर व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी मंजूनाथ पाटील यांनी महिलांची आरोग्य तपासणी केली तसेच सी.एस. कोळी (कार्यालय अधीक्षक) यांनी सार्वजनिक आरोग्य सुस्थितीत राहणेसाठी महिलांच्या योगदानाकरिता मार्गदर्शन केले. उपस्थित महिलांना माझी वसुंधरा अभियानांतर्गत ई-शपथ देण्यात आली ओला व सुका कचऱ्याचे वर्गीकरण या बद्दल माहिती देण्यात आली.



## वेळापूर महावितरणच्या महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान

**वेळापूर** : ८ मार्च रोजी महिला दिन सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.अत्यावश्यक सेवेत असणाऱ्या विजेच्या विभागात आता महिलाही मोठ्या प्रमाणावर काम करू लागल्या आहेत. आपल्या सहकारी महिला कर्मचाऱ्यांना महिला दिनाचे औचित्य साधून महावितरण वेळापूर उपविभागीय कार्यालयात उपकार्यकारी अभियंता अजय बोधे, सहाय्यक अभियंता भाऊसाहेब मोटे यांच्या हस्ते शाल व पुस्तके देऊन सन्मानित करण्यात आले.सहाय्यक अभियंता चैताली सागर,लिपिक निशा वळवी,सुचिता साळवी,प्रधान तंत्रज्ञ मंगल कंद्रे,विद्युत सहाय्यक शिला खाडविलकर,अपेक्षा चौधरी या महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान झाला.याप्रसंगी उपकार्यकारी अभियंता अजय बोधे, सहाय्यक अभियंता भाऊसाहेब मोटे,संतोष सूळ,गोपाळ कदम, उपव्यवस्थापक सुरेश वसेकर, संजय माळी, नितीन वाघे,विभागीय सचिव बंडु कोळी उपस्थित होते.

# जिजाऊ ब्रिगेडतर्फे किडनी दान करणाऱ्या महिलांचा सन्मान

## अकलूजमध्ये महिला दिनानिमित्त विशेष उपक्रम

सुराज्य/अकलूज

**भावाला,पतीला तर कुणी आपल्या मुलाला स्वतःची किडनी दान करून संसार वाचविणाऱ्या महिलांच्या वेदना ऐकून उपस्थित सर्वच महिला गहिवरल्या आणि आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली. औचित्य होते महिला दिनाचे आणि या निमित्ताने किडनी दान करणाऱ्या महिलांनी आपल्या मनात साठलेल्या भावनांना वाट करून दिली आणि संपूर्ण वातावरण अगदी भावनिक झाले.**



### किडनी दान करून महिलांनी आदर्श निर्माण केला

देहदान करून मृत्यूनंतर अवयव दान केले जाते मात्र या महिलांनी जिवंतपणीच आपले अवयव दान केल्याने एक समाजामध्ये आगळा वेगळा आदर्श निर्माण केला आहे.महिला या सदैव कणखरपणे संसाराला साथ देत असतात संसारात आलेल्या दुःखाला त्या निर्भीडपणे सामोरे जात असतात. कुटुंब वत्सल म्हणून महिलांची विशेष ओळख आहे. सदरील महिलांनी किडनी दान करून संसार वाचवले आहेत त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे.

**- मनोरमा लावंड (तालुकाध्यक्षा, जिजाऊ ब्रिगेड)**

अकलूज येथे जिजाऊ ब्रिगेड माळशिरस तालुका सोलापूर पंढरपूर विभागाच्या वतीने ८ मार्च महिला दिनाचे औचित्य साधून कुटुंबातील व्यक्तीला किडनी दान करणाऱ्या महिलांचा सन्मान सोहळा जिजाऊ ब्रिगेडच्या तालुकाध्यक्षा मनोरमा लावंड यांनी आयोजित केला होता. सोलापूर जिल्हा अध्यक्ष सुरजा-ताई बोबडे व उपाध्यक्षा मनीषाताई जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अकलूज येथे हा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी प्रांतिक सदस्या प्रियाताई नागणे, अक्काताई नागणे,माळशिरस तालुका अध्यक्षा मनोरमा लावंड,उपाध्यक्ष मनिषा गायकवाड, शहराध्यक्ष शुभांगी क्षीरसागर, कार्याध्यक्ष शारदा चव्हाण, सुवर्णा गोरवे, संघटक वंदना पवार, कल्पना चव्हाण, संगीता जगदाळे, सुनिता नडगिरे तसेच अनिता शेंडगे,अर्चना धुमाळ, विजया शिंदे,कविता पुजारी,रेखा भगत मंजुषा गायकवाड, सुजाता विरकर, सविता तरंगे, शितल केचे आदीसह बहुसंख्येने महिला भगिनी उपस्थित होत्या.

याप्रसंगी किडनी दान करणाऱ्या सौ रुपाली राजेंद्र घोरपडे,श्रीमती संगीता दत्तू कोळेकर,सौ रेखा विठ्ठल ठवरे, जयश्री दत्तात्रय घोरपडे, अनुराधा इंगवले देशमुख, संध्या धुमाळ, श्रीमती रत्नप्रभा केचे, अलका शेंडगे, सुवर्ण भोसले आदि महिलांचा सन्मानचिन्ह प्रमाणपत्र आणि साडी देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी किडनी दान करणाऱ्या महिलांनी आपल्या भावना व्यक्त करताना जीवनात आलेल्या कटू प्रसंगाचे कथन केले. आलेल्या प्रसंगाला सामोरे जात असताना निर्णय घेत किडनी दान केल्याने समाधानी आणि आनंदी असल्याचे सांगत जीवदान दिल्याचे खूप मोठे कार्य जीवनात घडून गेल्याचा आनंद गगनात न मावणारा आहे अशा भावना व्यक्त केल्या. त्यांच्या या भावना ऐकून महिला वर्ग ही याप्रसंगी गहिवरला आणि त्यांनी आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली. भारावलेल्या वातावरणात सदरचा कार्यक्रम पार पडला असला तरी जिजाऊ ब्रिगेडने आगळावेगळा कार्यक्रम राबवून समाजामध्ये आदर्श निर्माण केल्याच्या भावना यावेळी प्रत्येक महिला व्यक्त करताना दिसत होत्या. जिजाऊ ब्रिगेडने या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाचे उत्कृष्टरित्या नियोजन केले होते. प्रत्येक महिलेच्या डोळ्यांच्या कडा अश्रूंनी भरून आलेल्या दिसत होत्या. परिसरातील बहुसंख्य महिलांनी या कार्यक्रमास उप-स्थिती दर्शवली होती.

# कांद्याने केले वांदे, दरात घसरण बाजारात नेणे सुद्धा परवडेना

सुराज्य/पिलीव

वाढती रासायनिक खते, औषधे, शेणखत,मशागत याचा विचार करता शेतकऱ्यांना कमीत कमी ५० ते ६० रुपये दराने तरी कांदा विक्री होणे आवश्यक आहे पण एवढा सुद्धा दर मिळत नाही.

संपूर्ण महाराष्ट्रात सध्या कांद्याच्या दरात प्रचंड घसरण झाल्यामुळे शेतकरी सध्या प्रचंड अडचणीत आला आहे. भला मोठा खर्च करून शेतकऱ्यांनी कांदा पिकाचे उत्पन्न घेतले पण ज्या वेळी कांदा विक्री करायची तेव्हा दरात एवढी घसरण झाली की त्यामुळे शेतकऱ्यांनी केलेला खर्च तर निघेना पण बाजारात दराची घसरण एवढी झाली आहे की मागेल त्या दरात कांदा शेतकऱ्यांना द्यावा लागत आहे त्यामुळे बाजार समिती पर्यंत कांदा नेण्यासाठी जो खर्च येतोय तेवढा सुद्धा खर्च निघेना एवढी विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे. एकतर शेतकरी ऊस किंवा इतर पिकांना पर्याय म्हणून तसेच लगेच पैसे मिळतात म्हणून हे पीक घेतात पण सध्या दर पडल्यामुळे शेतकरी कांदा पीक घेऊन चांगलाच अडचणीत आला आहे.

बाजार समितीत मोठ्या प्रमाणावर कांदा येत आहेत पण दर पूर्णपणे गडगडले आहेत. चांगल्या एक नंबरच्या कांद्याला दहा रुपये किलो एवढा दर मिळत आहे. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणीत पूर्ण बिघडले आहे. कांदा हा तसा दररोजच्या आहारात लागणारी गोष्ट आहे पण एवढ्या मोठ्या प्रमाणात खप असूनही शेतकऱ्यांना कवडी मोल दराने कांदा विकावा लागतो शासनाने याबाबतीत विचार करून कांद्यासाठी हमीभाव देण्याची तरतूद करणे आवश्यक आहे. पण शासन शेतकऱ्यांची एवढी बिकट अवस्था होऊन काहीच शेतकऱ्यांसाठी निर्णय घेत नाही अशी परिस्थिती आहे.



# वेगळ्या वाटा शोधणाऱ्या महिलांचा पुल्ली शाळेत सन्मान

सुराज्य/सोलापूर

पूर्व भागातील बहुतांश विडी कामगार असलेल्या तेलुगू भाषिक महिला आपल्या परंपरागत व्यवसाया व्यतिरिक्त उद्योग, व्यवसाय, नोकरीच्या वेगळ्या वाटा शोधल्या असून त्यांच्या क्षेत्रात यशस्वी घोडदौड करताना दिसत आहेत. जागतिक महिला दिनानिमित्त अशा संघर्षशील व कर्तृत्ववान वीस महिलांचा सन्मान पद्मशाली शिक्षण संस्था संचलित भू .म पुल्ली कन्या प्रशाला आणि इनरव्हील क्लब हार्मनी यांच्या वतीने प्रशालेच्या प्रांगणात करण्यात आला .यावेळी प्रमुख पाहुणे लक्ष्मी चव्हाण,मुख्याध्यापिका गीता सादुल,पर्यवेक्षिका जाहेदा जामदार, उमा कोटा,रोहिणी गुर्रम,लता संभारम,लक्ष्मी कोंडा,पल्लवी वायचळ,सुरश्री नामा आदी उपस्थित होते.

यावेळी गीता सादुल यांनी विद्यार्थिनींनी वेगळी वाट शोधलेल्या आपल्या आईच्या कष्टाची जाणीव ठेवण्यास सांगितले . संघर्षशील आणि कर्तृत्ववान महिलांचा सन्मानचिन्ह आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने वकील, प्राध्यापिका, शिक्षिका,परिचारिका, विणकर ,ब्युटीशियन ,मेसचालक, अकौंटंट ,शिवण क्लास चालक,उद्योजिका यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमा कोटा यांनी केले ज्योत्स्ना अकुल यांनी आभार मानले . कार्यक्रम यशस्वितेसाठी उपमुख्याध्यापक तुकाराम श्रीराम व सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले.

**या कर्तृत्ववान महिलांचा झाला सन्मान** : अन्नपूर्णा लक्ष्मीनारायण गोटीपामुल - (शिक्षिका), लक्ष्मी व्यंकटेश चिप्पा (परिचारिका), श्रवंती श्रीकांत बंडा (लघू उद्योजक), रेणुका नागेश धनुरे (मेस चालक), सुमलता नागराज बोड्याल (नॅपकिन बुके उत्पादक), प्रभावती रामकृष्ण संकारम (सेल्स एक्झिक्युटिव्ह), लता मनोहर आडम (ब्युटी पार्लर), सारिका अनिल जाधव (कामगार), सुवर्णा विलास गडगी (शिक्षिका), राणी अंबादास गोडबरलू ( वकील), भाग्यश्री श्रीनिवास दासरी ( वकील), पल्लवी अंबादास सादुल (लेखनिक), स्मिता नंदकिशोर हबीब (महिला उद्योजक), लक्ष्मी वासुदेव नडीमेटला ( कापड व्यापारी), अरुणा अर्जुन कनकी ( विणकर), सारिका राजीव उदगिरी (अकाउंटंट), शीला आतिश जमदाडे (लेडिज टेलर , ब्युटीशीयन), सौ संगीता अरविंद मडिवाळ (शिवण क्लास टीचर), अन्नपूर्णा विश्वनाथ नल्ला (पेट्रोल पंपावर सेविका), पूजा परांडकर (रिचारिका).



# अभ्यासाला वेळ दिल्याशिवाय यश मिळत नाही : कोळी

सुराज्य/वेळापूर

अभ्यासासाठी वेळ दिल्याशिवाय यश मिळत नसल्याचे प्रतिपादन इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शनद्वारे नियुक्ती झालेल्या कु.संजीवनी कोळी यांनी श्रीमती पार्वतीबाई ननवरे हायस्कूल खंडाळी ता. माळशिरस येथे महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी केले.

प्रथम संजीवनी कोळी, अध्यक्ष सुभाष गांधी यांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वती क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व संस्थेचे प्रेरणास्थान स्वर्गीय उत्तमचंद (दादा)गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की ग्रामीण भागातील मुलींनी स्पर्धापरीक्षा द्याव्यात आपले स्वप्न साकार करण्यासाठी कोणत्याही अडचणींना धैर्याने सामोरे जावे .आई-वडील व गुरुजनांचा आदर करावा.एमपीएससी यूपीएससी तसेच बँकिंग क्षेत्रातील परीक्षेसाठी खूप तयारी करावी लागते एक-दोन वर्ष अभ्यासासाठी भरपूर वेळ द्या . कठोर परिश्रमाशिवाय यश मिळत नाही. प्रशालेतील इ.६ वीत शिकणारा साई पताळे या विद्यार्थ्याची सैनिक स्कूलसाठी निवड झाल्याबद्दल संस्थाध्यक्ष - सुभाष गांधी यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. सन्मती प्राथमिक विद्यालयाच्या मुलींनी झाशीची राणी महात्मा फुले, सावित्रीबाई फुले ,डॉक्टर अशा वेगवेगळ्या वेशभूषा केल्याने कार्यक्रमात शोभा आली .कार्यक्रमास सरपंच सुनीता सुरवसे,उपसरपंच -सुरेखा पताळे संगीत शिक्षक -जीवन चव्हाण ,उपाध्यक्ष -धर्मराज शिंदे ,सचिव श्रीमंत कानगुडे,चंद्रकांत पताळे ,सुरेश सुरवसे ,अशोक पत-ाळे ,नागनाथ भोसले ,महिला पालक .महिला शिक्षिका उपस्थित महिला पालकांचा सत्कार करण्यात आला.

## ढोक बाभुळगाव येथे चाकूने मारहाण

**सोलापूर** : गुन्हा दाखल झाल्याच्या कारणावरून चाकू आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत सुरेश बळीराम मुळे (वय ४४ रा. ढोक बाभुळगाव ता.मोहोळ) हे जखमी झाले. ही घटना गावातील ग्रामपंचायत जवळील मारुती मंदिराजवळ बुधवारी सकाळच्या सुमारास घडली. त्यांना मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. गोविंद संजय चव्हाण त्याचा भाऊ गोटू चव्हाण आणि अन्य तिघांनी मिळून मारहाण केली. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# पेन्शन संघटनेच्या वतीने आमरण उपोषण

सुराज्य/अक्कलकोट



सोलापूर जिल्ह्यातील शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी सोलापूर जिल्हा जुनी पेन्शन संघटनेच्या वतीने दि. ८ मार्च २०२३ पासून बेमुदत आमरण उपोषणाला सुरुवात करण्यात आली आहे.

शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत वारंवार अर्ज विनंती करूनही शिक्षण विभाग कसलीही हालचाल करत नाही. शिक्षकांच्या हक्काच्या लाभापासून वर्षानुवर्षे वंचित ठेवले जात आहे. खालील प्रमुख मागण्यांसाठी हे उपोषण सुरू आहे.

अक्कलकोट तालुक्यातील शिक्षकांच्या डिसीपीएस कपातीची रक्कम शासन हिस्सा व व्याज खात्यावर वर्ग करा. सन २०१३ पूर्वी लाखो रुपये कपात करण्यात आले पण आज १० वर्षे झाले तरी ती रक्कम शिक्षकांच्या खात्यावर जमा झालेली नाही, बदली प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करा, समाजशास्त्र विषय शिक्षकांचे समायोजन तातडीने करण्यात यावे. शिक्षणसेवक व वरिष्ठ वेतनश्रेणी प्रस्ताव तातडीने मंजूर करण्यात यावेत.

यासह विविध मागण्या संदर्भात दयानंद चव्हाण, राजेंद्र सूर्यवंशी, विक्रम जाधव, अरुण पांचाळ, ज्ञानोबा केंद्रे या उपोषणकर्त्यांनी प्रश्न निकाली निघेपर्यंत माघार घेतली जाणार नाही असा निर्धार व्यक्त केला.

# चित्रीकरणापेक्षा विवाहपूर्व समुपदेशनाला महत्त्व द्या : डॉ. काळे

सुराज्य/सोलापूर

जागतिक महिला दिनाचे कार्यक्रम असो किंवा विविध विषयांवर कनिष्ठ महाविद्यालय वा वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रबोधनाच्या कार्यक्रमात मुली मोठ्या संख्येने उपस्थित असतात. त्या विषयाला मुलींकडून दादमिळते, मुली खूप खंबूरपणे आपली मते तेथे मांडतात. ज्या मुली कॉलेजमध्ये धाडसी होत्या, त्याच पुढे लग्नानंतर कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडतात असे अनुभवायला येते. मुलींच्या लग्नात पालकांनी मोठे खर्च करण्यापेक्षा व विवाहपूर्व चित्रीकरणापेक्षा विवाहपूर्व समुपदेशनाला महत्त्व द्या असे पोलीस उपयुक्त डॉ. दिपाली काळे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाच्या राष्ट्रीय संस्थापिका पद्मविभूषण कै. आबाबाई वाडिया कर्तृत्वशालिनी महिला स्मृती पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते त्या प्रसंगी त्या बोलत होत्या.



सोलापूर जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांची यां पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वालचंद समाजकार्य विभागाच्या प्रा. डॉ. विजया महाजन या होत्या.

यावेळी व्यासपीठावर प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, प्राचार्य के. एम. जमादार, प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते.

डॉ. दिपाली काळे यांच्या हस्ते दै. दिव्य मराठीच्या वरिष्ठ पत्रकार अश्विनी तडवळकर, सामाजिक कार्यकर्त्या व टायगर ग्रुप सोलापूरच्या अध्यक्षा कविता चव्हाण, यशस्विनी ग्रो प्रोड्युसर कंपनीच्या संस्थापिका अनिता माळगे, साथी संस्थेच्या कार्यक्रम अधिकारी रंजना अक्षंतल-महिमकर यांना पद्मविभूषण कै. आवाबाई वाडिया कर्तृत्वशालिनी स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र, शाल व बुके असे पुरस्काराचे स्वरूप होते. कार्यक्रमाचे स्वागत प्राचार्य के. एम. जमादार यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले. सूत्रसंचालन सुगतरत्न गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. डॉ. आयेशा रंगरेज यांनी मानले.



## मॉडेल विविधांगी प्रशालेत महिला दिन साजरा

**माळीनगर** : दि मॉडेल विविधांगी प्रशाला माळीनगर येथे आठ मार्च जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी सर्व महिला शिक्षकांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व प्रियदर्शनी इंदिरा गांधी यांचे प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रशालेच्या वतीने सर्व महिला शिक्षिकांचा गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला महेश शिंदे व जगन्नाथ कोळी यांनी महिलांविषयी गींत सादर केले. सुनील शिंदे सविता क्षीरसागर यांनी आपले विचार व्यक्त केले. स्नेहा तडवळकर, शाहीद काझी, राजनंदिनी घळके, प्रणाली घोळवे यांची भाषणे झाली. श्रीहरी देशमाने नी सूत्रसंचालन केले तर आभार संजय बांदल यांनी मानले



## जि.प. खंडाळी शाळेत विविध उपक्रमाने महिला दिन साजरा

**वेळापुर** : आठ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त खंडाळी शाळेमध्ये भरगच्च अशा कार्यक्रमाने व महिलांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामध्ये महिला दिन साजरा करण्यात आला. खंडाळी गावच्या सरपंच सुनिता सुरवसे, उपसरपंच सुरेखा पताळे व शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्षा अर्चना निकम तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सारिका महाजन यांच्या हस्ते सावित्रीबाईंच्या प्रतिमेचे पूजन करून महिला दिनाच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. सावित्रीबाईंची ओवी, विद्यार्थ्यांचे विविध कर्तबगार महिलांविषयीची भाषणे तसेच मुलींचा सांस्कृतिक कार्यक्रम झाल्यानंतर महिलांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामध्ये रांगोळी स्पर्धा ,पाककला स्पर्धा, दोरी उड्या स्पर्धा, पार्टीला फुगा लावून चालणे, लिंबू चमचा तसेच संगीत खुर्ची या स्पर्धा घेऊन विजेत्यांना खंडाळी सरपंच सुनिता सुरवसे व उपसरपंच सुरेखा पताळे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी पाककलेमधील पदार्थांचा व शाळेतर्फे दिल्या जाणाऱ्या नाश्त्याचा आस्वाद घेतला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शीतल बिराजदार व कविता हिंगमिरे यांनी केले. शेवटी सर्वांचे आभार छाया पोळ यांनी मानले. सर्व कार्यक्रम पार पाडण्यासाठी अंगणवाडीसेविका व मदतनिस यांचे सहकार्य लाभले.



## आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने पाठावरच्या महिलांना भेटवस्तू

**सांगोला** : जागतिक महिला दिनानिमित्त आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने पालावर राहणाऱ्या महिलांना गुलाब पुष्प व भेटवस्तू देऊन महिला दिन साजरा करण्यात आला. सांगोला येथील आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला. रोजी रोटी साठी भटकंती करत गावोगावी फिरत काबाड कष्ट करणाऱ्या कुटुंबातील महिलांना त्यांच्या राहत्या पालावर जाऊन गुलाब पुष्प व पाण्यासाठी स्टील कळशी भेटवस्तू देऊन जागतिक महिला दिनानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या. ज्यांना जागतिक महिला दिन म्हणजे काय? हेही माहित नाही, अशा महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्याबद्दल त्या महिलांनाही मोठा आनंद झाला. व त्यांनी आभार व्यक्त केले. यावेळी अध्यक्ष राजेंद्र यादव, सचिव संतोष महिमकर, प्रमोदकाका दौंडे, महादेव दिवटे, दादा खडतरे आदी उपस्थित होते.




## अकोलेकाठीत विविध विकासकामांचा शुभारंभ

**उत्तर सोलापूर** : अकोलेकाठी येथे समाज कल्याण अंतर्गत दलित वस्ती योजनेतून सोमनाथनगर येथे अंतर्गत गटारी,इतर विविध विकास कामाचे शुभारंभ लोक नियुक्त सरपंच अंजली क्षिरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ज्ञानेश्वर पाटील, शाहू लामकाने, धनंजय शिरसागर, दादा कोरे, तात्या गोरे, मह्लू जांभळे, सुरेखा गोरे, उर्मिला शिंदे, दीपक डांगे, हर्षवर्धन क्षीरसागर, राहुल वाघमारे, समाधान पाटील उपस्थित होते.

## सांगोला न्यायालयात सर्व विधिज्ञांकरिता ई-फाईलिंग कार्यशाळेचे आयोजन

**सांगोला** : सांगोला न्यायालयात सर्व विधिज्ञकरिता शनिवार चार मार्च रोजी ई फाइलिंग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. मुख्य न्यायाधीश श्रीमती ए स के देशमुख. सह दिवाणी न्यायाधीश यु.म.पाटील, तिसरे सह दिवानी न्यायाधीश केबी सोनवणे, सांगोला विधिज्ञ संघाचे अध्यक्ष डॉ.धनंजय मेटकरी यांच्या उपस्थितीत ही कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी प्रास्ताविक सहाय्यक सरकारी वकिल ड सारंग वांगीकर यांनी केले मास्टर ट्रेनर डॉ.आयुब पटेल यांनी विधीज्ञ नी ई फाइलिंग करिता रजिस्ट्रेशन कसे करावे व पेपरलेस फायलिंग बाबत माहिती दिली. मास्टर ट्रेनर ड नितीन बाबर यांनी केसेस ई फायलिंग द्वारे कसे दाखल करावे याची माहिती दिली. या कार्यशाळेस विधीज्ञनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन कार्यशाळेत सहभाग नोंदविला. यावेळी सांगोला विधीज्ञ संघाचे सर्व पदाधिकारी विधीज्ञ व त्यांचे लिपिक उपस्थित होते. आभार प्रदर्शन डॉ.धनंजय मेटकरी यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहाय्यक अधीक्षक आर एम किलजे, वरिष्ठ लिपिक डी बी राहीरकर, लिपिक टी व्ही वद्दी, लिपिक ए एस यादव तसेच सर्व न्यायालयीन कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.



### सलगर ते तोरणी रस्त्याच्या कामांचे भूमिपूजन

# रस्त्यांची कामे दर्जेदार होण्यावर लक्ष : आ.कल्याणशेट्टी

**सुराज्य/अक्कलकोट**

**अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाच्या चौफेर विकासासाठी आपण कटिबध्द असल्याचे सांगून, रस्त्यांची विकास कामे होत असताना दर्जेदार होण्यावर लक्ष असून त्याचा परिणाम येणाऱ्या काळात दिसेल, अशी ग्वाही आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली. तालुक्यातील सलगर ते तोरणी या ०७.०० कि.मी.चा रस्त्यासाठी साडेतीन कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.**



या रस्त्याच्या भूमिपूजनप्रसंगी आ.कल्याणशेट्टी बोलत होते. पुढे बोलताना आ.कल्याणशेट्टी म्हणाले,सलगरसह महाराष्ट्र व कर्नाटक सीमावर्ती भागातील गावे विकासापासून दुर्लक्षित राहिलेली आहेत.रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे.त्यामुळे दळणवळणाचा प्रश्न निर्माण होत होता. ऊस वाहतूक करताना अनेकवेळा गाड्या पलटी झाल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. त्यामुळे या भागातील सर्व रस्ते येणाऱ्या काळात चकाचक होतील एकही रस्ता सोडणार नाही. सर्व रस्ते मार्गी लागतील, असा विश्वास त्यांनी विश्वास व्यक्त करत केंद्र व राज्य राज्य सरकारच्या विविध योजनांच्या माध्यमातून निधीची तरतूद केली जात आहे.विकासकामे होत असताना गुणवत्तेला महत्त्व दिले जाईल, यापुढे सीमावर्ती भागातील रस्त्याच्या कामांना प्राधान्य देणार आहे,असे आश्वासन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिले.व सन-२०१९ पासून ते आतापर्यंतच्या कालावधीत केवळ रस्त्यासाठी दीडशे कोटीहून अधिक रक्कम निधी एकट्या अक्कलकोट तालुक्यासाठी मिळालेला आहे. त्यामधून बरीच कामे मार्गी लागली असून, आणखीन काही कामे होणार आहेत. दर्जेदार कामे होण्यावर लक्ष असून त्याचा परिणाम येणाऱ्या काळात दिसेल, असेही आ. कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

यावेळी सलगर चे जयशेखर पाटील, सुभाष शटगार, शरणप्पा कोळी, मे.सोलापूर कन्स्ट्रक्शन ऍन्ड फॅब्रिकेशन प्रा. लि. सोलापूरचे ठेकेदार, बाबुराव होरपेटी, मल्लिनाथ भासगी, राजकुमार झिंगाडे, अशोक बिराजदार, प्रविण बिराजदार, अमोल पुटगे, फकिरप्पा बोरगाव, काशिनाथ चिकमळ, संतोष माशाळे, परशुराम पुटगे, सचिन खोबरे, हरीश शटगार, श्रीकांत पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता अमोल खमितकर, ग्रामसेवक प्रदीप तोरस्कर, धनंजय गाढवे यांच्यासह सलगर, तोरणी, भोसगे, चिक्केहळळी आदी गावांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बोलेरो जीप अडवून शिवीगाळ व मारहाण

**सांगोला** : धनाजी मारुती घाडगे यांनी विकत घेतलेले सिमेंटचे पैसे दिले नाही म्हणून बाळासाहेब निवृत्ती काटकर यांनी बोलेरो जीप अडवून गाडीची चावी काढून धक्काबुक्की दमदाटी व शिवीगाळ केली म्हणून सांगोला पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आल्याने राजकिय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

फिर्यादी सरकारी ठेकेदार धनाजी घाडगे (वय ४५ रा. चिंचोली तालुका सांगोला) येथील रहिवाशी असून त्याने सरकारी कामासाठी सिमेंट विक्रेते बाळासाहेब काटकर यांचे कडून वारंवार सिमेंट खरेदी करीत असत त्यांच्या आर्थिक व्यवहार होता.घाडगे हा स्वतःच्या मालकिच्या बोलेरो चार चाकि (नंबर एम एच १३ एएक्स ११ ५९) या वाहनाने वाकि शिवणे येथे केटर्स ठरविण्यासाठी चालक सूर्यकांत अंकुश कांबळे यांचे समवेत गेला होता तेथून परत येत असता हलदहिवडी येथे विशाल बाळासाहेब काटकर हा जीपच्या आडवे येऊन थांबला चालकाने गाडी थांबवली विशालने वडील बाळासाहेब काटकर या त्वरित बोलावून घेतले बाळासाहेब यांनी येऊन बोलोरो गाडीची चावी काढून घेतली व घाडगे बसलेल्या बाजूला जाऊन दरवाजा उघडून धक्काबुक्की करून पैसे दिल्याशिवाय जायचं नाही म्हणून दमदाटी शिवीगाळ केली म्हणून सांगोला पोलीस स्टेशन मध्ये फिर्या दाखल केली आहे सदर घटना मंगळवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास घडली.

## माळीनगर येथे महिला दिन विविध स्पर्धांनी साजरा



**सुराज्य/माळीनगर**

गट नं.२ (ता.माळशिरस) येथील प्राथमिक शाळा क्रमांक ३ मध्ये महिलांच्या विविध स्पर्धा घेऊन जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.

प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटीच्या संचालिका ज्योती लांडगे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी महाळुंगच्या नगरसेविका कल्पना काटे, अर्चना पांढरे, सीमा पांढरे, सारिका नाळे, श्वेता बोरावके, रजनी देवकर, ललिता नागटिळक, रेश्मा आरडे उपस्थित होत्या. पाककला, रांगोळी, संगीत खुर्ची या स्पर्धा घेण्यात आल्या. गट नं.२, पंचवीस चार, पायरी पूल, कदम वस्ती येथील महिलांनी स्पर्धेत सहभाग नोंदवला. विजेत्या महिलांना साडी, स्टीलचा डबा, चपाती डबा अशी बक्षिसे देण्यात आली.

**स्पर्धेतील विजेते :** पाककला स्पर्धा (भरले वांगे, ठेचा, भाकरी) : उमा बोरावके, राजश्री कदम, कोमल रेणके, उत्तेजनार्थ - सोनाली कांबळे, रुपाली शिंदे; रव्याचे लाडू : भाग्यश्री चोरमले, अलका गलांडे, माधुरी पवार, उत्तेजनार्थ-अर्चना पांढरे

**रांगोळी स्पर्धा :** शिल्पा कदम, श्वेता बोरावके व कल्पना भोळे (विभागून), उमा बोरावके व उज्वला मोरे (विभागून), उत्तेजनार्थ-वर्षा राऊत

**संगीत खुर्ची :** गट एक-अर्चना पांढरे, रुपाली शिंदे, पल्लवी शिंदे, गट दोन - भाग्यश्री चोरमले, अर्चना जाधव, सीमा पांढरे

## झिजेंवस्ती ग्रामपंचायतत जागेच्या पोटनिवडणुकीची प्रक्रिया सुरु

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील झिंजेवस्ती येथील ग्रामपंचायतीच्या प्रभाग क्रमांक दोनमध्ये रिक्त असणाऱ्या जागेसाठी पोटनिवडणूक घेण्यासाठी निवडणूक प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. यासाठी प्रभाग क्रमांक दोन मधील मतदार यादीचे प्रसिध्दी करण करण्यात आले आहे.

या प्रभागामध्ये एकुण ७९४ मतदार आहेत. यामध्ये ३९८ महीला व ३९६ पुरुष मतदार आहेत. याठिकाणी असणाऱ्या सदस्यांचे शासनाच्या जागेवर अतिक्रमण केल्यामुळे जिल्हा अधिकारी यांनी सदरच्या सदस्यास अपात्र केले आहे. याठिकाणी लोकनियुक्त सरपंच व ९ ग्रामपंचायत सदस्य एक सदस्य अपात्र असल्यामुळे सत्ताधारी व विरोधी गटाकडे प्रत्येकि चार-चार ग्रामपंचायत सदस्य आहेत. त्या दृष्टींने दोन्ही गटाकडून हालचाली सुर आहेत. याठिकाणी सहा ते सात महीनेच ग्रामपंचायतीची मुदत राहील्याने पोटनिवडणुक होणार का सामोपचाराने ही निवडणूक बिनविरोध होणार याकडे झिंजेवस्ती वासीयांचे लक्ष लागले आहे.

## पशु प्रदर्शनात मोहोळच्या सुनील पवार यांची गाय प्रथम

**सुराज्य/विरवडे बु.**

पंचमहाभूत लोकोत्सव कनेरी मठ कोल्हापूर येते देशी पशु प्रदर्शनात मोहोळ तालुक्यातील विरवडे बु येतील सुनील बाळासाहेब पवार यांच्या गाईने प्रथम क्रमांक पटकवत एक लाख रुपयांचे बक्षीस मिळवले आहे .



सिद्धगिरी महासंस्थान कनेरी मठ सिद्धगिरी कृषी विज्ञान केंद्र कनेरी व पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन यांच्या सयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या पशुप्रदर्शनामध्ये सर्वोत्कृष्ट खिलार गाय म्हणून सुनील पवार यांच्या गाईला प्रथम क्रमांक मिळाला आहे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. कणेरी मठ कोल्हापुर येथे पंचमहाभूत लोकोत्सव कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमाचे उद्घाटन देशाचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते करण्यात आले होते सदर उत्सवात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री फडणवीसांनी भेट दिली होती. लोकोत्सव कार्यक्रमानिमित्त कणेरी मठ येथे भव्य असे देशी पशुप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते या प्रदर्शनामध्ये २०००ते २२०० खिलार गुरे सहभागी झाले होते या मद्ये एक वर्षखालील गट एक वर्षाच्या पुढील गट ,दोन दाती, चार दाती सह दाती गट असे विविध गट तयार करण्यात आले होते. तर प्रत्येक गटासाठी तीन नंबर देण्यात आले होते.

तर सर्व गटातून एक चंपियन क्रमांक काढण्यात आला व सर्वुकुस्ट गाय म्हणून विरवडे बु येतील सुनील पवार यांच्या गाईला देण्यात आला व एक लाख रू बस्सिस व ढाल देऊन सन्मान करण्यात आले. या अगोदर ही पवार यांच्या गाईला अनेक ठिकाण बक्षीसे मिळाली आहेत.

## चिखलीच्या जिल्हा परिषद शाळेत विविध कार्यक्रम

**चिखली** : मोहोळ तालुक्यातील चिखली येथे दि. ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त जिल्हा परिषद शाळेत उत्साहात व विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समिती सदस्या दिपाली मते तर प्रमुख पाहुणे म्हणून चिखली गावच्या ग्रामपंचायत सदस्या पल्लवी बाळू शिंदे होत्या . सदर कार्यक्रमासाठी उषा जाधव, पूनम आतकरे, सोनाली सिरसट, कोमल आतकरे, पुजा आडकर, सुवर्णा व्यवहारे यासह गावातील व परिसरातील बहुसंख्य महिला. तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विष्णू कोळेकर, उपाध्यक्ष मुकूंद मते, सदस्य व सर्व महिला सदस्या उपस्थित होते. जागतिक महिला दिनाची सुरूवात उपस्थित मान्यवर महिलांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्चना घुगे यांनी केले. त्यानंतर शाळेच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. शाळेतील शिक्षका, अंगणवाडी सेविका, मदतनीस तसेच आशा वर्कर यांचाही सन्मान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ व गुलाब पुष्प देऊन करण्यात आला. यावेळी शाळेतील मुलींनी कर्तुत्ववान महिलांच्या जीवनावर आधारित उत्कृष्ट अशी भाषणे व गीते गायन केले. महिलांसाठी मनोरंजनाच्या स्पर्धा घेऊन प्रत्येक स्पर्धेतील प्रथम क्रमांकाना बक्षीस देण्यात आले.

तसेच शाळेच्या वतीने सर्व महिला व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. मनोरंजनाच्या स्पर्धेचे नियोजन सुनंदा हिलाले, अर्चना घुगे, मालन चेंडगे, यांनी केले. तर कार्यक्रमाची सुंदरता वाढली ती मालन चेंडगे, सुनंदा हिलाले यांच्या सुंदर रांगोळी व अर्चना घुगे मॅडम यांच्या उत्कृष्ट फलक लेखनाने. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मालन मालन चेंडगे मॅडम यांनी केले तर आभार अर्चना घुगे यांनी मानले. जागतिक महिला दिन उत्साहात व विविध कार्यक्रमाने मोठ्या थाटामाटात व दिमाखात झाला.

## हिंदीत रिलीज होणार 'रौंदळ'

**सोलापूर** : 'रौंदळ' हा एक वेगळ्या धाटणीचा चित्रपट अखेर रसिकांच्या भेटीला आला आहे. प्रेक्षकांनी फर्स्ट डे फर्स्ट शोपासूनच 'रौंदळ' पाहण्यासाठी गर्दी केली. प्रतिसादाच्या बळावर शुक्रवार,शनिवार आणि रविवारी या चित्रपटानं ५ कोटी रुपयांहून अधिक व्यवसाय केला आहे. या सकारात्मक चित्रानंतर लवकरच 'रौंदळ' हिंदी भाषेतही प्रदर्शित करण्यात येणार असल्याचं निर्मात्यांनी घोषित केलं आहे.

## महिला दिन : महावितरणच्या महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान

**सुराज्य/अकलूज**

८ मार्च रोजी महिला दिन सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.अत्यावश्यक सेवेत असणाऱ्या विजेच्या विभागात आता महिलाही मोठ्या प्रमाणावर काम करू लागल्या आहेत.विविध क्षेत्रात महिलांना काम करताना प्रोत्साहित करून त्यांचे महिला दिनी कौतुक केले जाते.



आपल्या सहकारी महिला कर्मचाऱ्यांना महिला दिनाचे औचित्य साधून महावितरण अकलूज उपविभागीय कार्यालयात उपकार्यकारी अभियंता डी बी ओमासे यांच्या हस्ते शाल व पुस्तके देऊन सन्मानित करण्यात आले. असीफा पठाण, राजमल अण्णादुराई, राजश्री खरात, अनुश्री सोढळ या महिला कर्मचाऱ्यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी उपकार्यकारी अभियंता दत्तात्रय ओमासे, उपव्यवस्थापक सुरेश वसेकर, दत्तात्रय यादव, महेश कांबळे, रोहित रसाळे, समीर शेख, हेमंत पवार, आनंद माळी, सत्यवान कांबळे व विभागीय सचिव बंडु कोळी उपस्थित होते.

# मुलींनी आपल्या अंतरिक धैर्यबळावर विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घ्यावी : इंगळे

■ कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतनमध्ये जागतिक महिला दिन साजरा

**सुराज्य/अक्कलकोट**

आज शिक्षणाच्या माध्यमातून समाजात तळागाळातील अनेक मुलीही सुशिक्षित होत आहेत. कारण स्त्री शक्तीला आत्मसंयम, आत्मधैर्याचे प्रचंड बळ स्वामींनी दिलेले आहे. आज सावित्रीबाई फुलेंची प्रेरणा घेऊन अनेक मुली विविध क्षेत्रात शिक्षण घेऊन देश व जगभरात विविध मोठ्या पदांवर कार्यरत आहेत. त्यांच्याप्रमाणे आपल्या व अन्य महाविद्यालयातील मुलीही साविञिबाई फुले, मदर तेरेसा, अंतराळाविर कल्पना चावला यांची व त्यांच्या कार्यासारखी मोठी प्रेरणा घेऊन शिक्षण घेत मुलींनी आपल्या आंतरिक धैर्यबळावर विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घ्यावी असे प्रतिपादन येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे व कै कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे चेअरमन महेश इंगळे यांनी केले.




आज जागतिक महिला दिनानिमित्त कै.इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयात विविध उपक्रम राबवून जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी इंगळे बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी आजच्या या जागतिक महिला दिनानिमित्त श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेस व कै.कल्याणराव इंगळे यांच्या अर्ध पुतळ्यास पुष्पहार अर्पण अभिवादन करण्यात आले. यानंतर महाविद्यालयातील स्टाफचे पुष्पगुच्छ देऊन महेश इंगळे यांनी स्वागत केले. यावेळी महेश इंगळे व महाविद्यालयाचे प्राचार्य नागनाथ जेऊरे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या हस्ते केक कापून व विद्यार्थ्यांना इंगळे यांनी केक भरवून जागतिक महिला दिनाचा आनंद द्विगुणीत केला. याप्रसंगी उपप्राचार्य पवार, खिलारी, पाटील करोटी, शिराळ, पोतदार, कांबळे, ममनाबाद, जहागिरदार, कोळी, लवटे महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनी व स्टाफ उपस्थित होते.

# कांद्याला भाव नाही, घरात खाणारी तोंडे नऊ, २५ वर्षांच्या शेतकऱ्याने केली आत्महत्या

✔ **बीड** : शेतात पिकवलेला कांद्याला योग्य भाव मिळाला नाही, त्यामुळे हातात पैसा देखील आला नाही, घरात नऊ जणांची खांद्यावर जबाबदारी, यातच लोकांकडून घेतलेले कर्ज फेडायचं कसं याची विवंचना, या कारणावरूनच बीडमधील युवा शेतकऱ्याने आत्महत्या केल्याचा आरोप होत आहे.

संभाजी अर्जुन अष्टेकर असे टोकाचे पाऊल उचललेल्या २५ वर्षीय तरुणाचे नाव आहे. आज आपल्या शेतात गळफास घेऊन त्याने आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे

एकीकडे घरात वृद्ध आई-वडील, तर दुसरीकडे दोन बहिणी, त्यात एकीच्या कपाळी वैधव्य, तिची दोन मुलं, याशिवाय एक भोळसर भाऊ अशा सगळ्यांना सांभाळण्याची जबाबदारी संभाजी अष्टेकर याच्या खांद्यावर होती. अवघं २५ वर्ष वय असलेल्या या तरुण पोरावर घरातील नऊ व्यक्तींची जबाबदारी आली होती. त्यात व्यवसाय शेतीचा. या सगळ्यांना सांभाळण्याच्या घोडदौडीत शेतीसाठी कर्ज घेतलं, कारण या शेतीच्या पिकातून कर्ज फिटेल आणि सगळ्यांचा उदरनिर्वाह होईल, या अपेक्षेतून कर्ज घेतलं, मात्र घडलं विपरीतच.

कांदा पिकासाठी खाजगी सावकाराकडून कर्जत घेतलं, मनापासून शेतात मेहनत करून कांदा पीकही चांगलं आणलं. मात्र यंदा कांदा पिकाला फारसा भाव नाही, पीक आलं भरभरून, मात्र त्याचा पैसा हा मूठभरच आला, आता सावकारायचं कर्ज फेडायचं कसं, या सगळ्यांना जगवायचं कसं, या विवंचनेतून अखेर संभाजी अर्जुन अष्टेकर याने घरात कोणाला न सांगता या सगळ्या विचारांचा भार स्वतः वरच ठेवला.



या चिंतेचा भार अति होत गेला आणि याचा शेवट आत्महत्येत झाला. या घटनेने संभाजीच्या वृद्ध आई-वडिलांसह दोन बहिणीही शोकसागरात बुडाल्या आहेत. मात्र परिसरात देखील दुःख व्यक्त केले जात आहे. अवघ्या २५ व्या वर्षीच पूर्ण कुटुंबाची जबाबदारी घेणाऱ्या या तरुणाचं कौतुक सगळेच करायचे, मात्र शेवटी महागाईने आणि शेतीमालाला भाव न मिळाल्याने बीड जिल्ह्यात एका तरुण शेतकऱ्याचा बळी गेल्याबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## माझ्या आईने तिसऱ्याच दिवशी सभागृहात नेले होते : शरद पवार

✔ सुराज्य/मुंबई

जागतिक महिला दिनानिमित्त राज्य महिला आयोगाच्या वतीने जागर स्त्रीत्वाचा, सन्मान कर्तत्वाचा या कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. या कार्यक्रमात बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी मातोश्री शारदाबाई पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला आहे. आईने तिसऱ्या दिवशी सभागृहात नेल्याने सर्व सभागृह पाहण्याची संधी मिळाली, असं विधान शरद पवार यांनी केलं आहे.

शरद पवार म्हणाले, माझ्या मातोश्री स्वातंत्र्य चळवळीत होत्या. चळवळीनंतर समाजकारण त्यांचं लक्ष होतं. तेव्हा जिल्हापरिषद नव्हती, जिल्हा लोकल बोर्ड होतं. सबंध जिल्ह्यातून एक महिला जिल्हा लोकल बोर्डावर जायची. त्यावेळी पुणे जिल्ह्यातून माझ्या मातोश्री बोर्डावर गेल्या. त्यांचं वैशिष्ट असं होतं, त्या कधीही लोकल बोर्डाच्या बैठकीला उशीरा जायच्या नाहीत, किंवा गैरहजर राहायच्या.

एकदिवशी त्यांनी एका मुलाला जन्म दिला. बाळंतपण आटोपलं. लोकल बोर्डाची बैठक असल्याने तिसऱ्या दिवशी बाळाला घेऊन बारामतीवरून पुण्याला खासगी बसने गेल्या. ते तीन दिवसांचं बाळ म्हणजे मी. विधानसभा, लोकसभा आणि अन्य ठिकाणी जायची संधी मिळाल्याने माझं कौतुक होतं. मात्र, माझ्या आईने तिसऱ्या दिवशी सभागृहात नेलं होतं. तिसऱ्या दिवशी सभागृह पाहिल्यामुळे ५६ वर्षे सतत विधानसभा, लोकसभा आणि राज्यसभेचं प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. याचं श्रेय मातेला द्यावं लागेल, यात शंका नाही, अशी भावना शरद पवारांनी व्यक्त केली.

जेव्हा-जेव्हा मला सभागृहात काम करण्याची संधी मिळाली, तेव्हा सतत समाजातील लहान घटकांना वर आणण्यासाठी सत्तेचा वापर केला. त्यात दलित, अल्पसंख्याक, महिला भगिनी हे सर्व घटक समाविष्ट होते, असं शरद पवारांनी सांगितलं.




## महापालिकेत नवीन ६ रिफ्युज कॉम्पॅक्टर वाहने दाखल

✔ **सोलापूर** : सोलापूर महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून दैनंदिन कचरा वाहतुकीसाठी सीएनजीवर चालणारे नवीन ६ नग रिफ्युज कॉम्पॅक्टर वाहने खरेदी केली आहेत. बुधवारी ही वाहने महापालिकेच्या ताफ्यात दाखल झाली आहेत. सध्या महानगरपालिकेकडे डीझेलवर चालणारे एकूण १४ रिफ्युज कॉम्पॅक्टर वाहने कार्यरत आहेत. त्यामधील ४ वाहने ही कंडम करण्यात येत असून सोलापूर शहरातील कचरा संकलन व वाहतूक सुरळीत चालावी याकरिता ही नवीन ६ वाहने खरेदी करण्यात आलेली आहेत. नवीन वाहने ही १० टन लोड क्षमता असलेली आहेत. या गाड्या सीएनजीवर चालणाऱ्या असून याला ॲव्हरेजही जास्त आहे. त्यामुळे पालिकेची आर्थिक बचत होणार आहे. प्रत्येक गाडीला १०० किलो सीएनजी बसणाऱ्या २ टाक्या असणार आहेत. या गाडीला १ किलो सीएनजीमध्ये १० ॲव्हरेज आहे. महानगरपालिकेच्या आवारात आयुक्त, शीतल तेली-उगले यांच्या हस्ते गाड्यांचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी अति. आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त मच्छिंद्र घोलप,उपायुक्त विद्या पोळ,सहा.आयुक्त विक्रमसिंह पाटील,आरोग्याधिकारी बसवराज लोहारे, सफाई अधीक्षक (वाहन) नागेश मेंडगुळे, मे.चव्हाण ॲटो व्हील्स प्रा.लि.यांचे प्रतिनिधी अंबादास चन्ना,श्रीकांत आवताडे आदी उपस्थित होते.

## शासकीय अधिकाऱ्यांशी पंगा नडला, माजी मंत्री बच्चू कडू यांना धक्का

### २ वर्षांच्या कारावासाची शिक्षा

✔ नाशिक/वृत्तसंस्था

अनोख्या शैलीतल्या आंदोलनांसह वादग्रस्त आंदोलनासाठी प्रसिद्ध असलेले आमदार बच्चू कडू यांना शासकिय अधिकाऱ्यांना मारहाण नाशिक जिल्हा न्यायालयाने दोन वर्षे कारावासाची शिक्षा सुनावली आहे. याप्रकरणात कडू यांना जिल्हा न्यायालयाने त्वरित अटी-शर्तीसह जामीन मंजूर केला आहे. याप्रकरणात कडू यांचे वकील मुंबई उच्च न्यायालयात दाद मागणार आहेत.

२०१७ मध्ये तत्कालीन महापालिका आयुक्त अभिषेक कृष्णा यांच्यावर आमदार कडू यांनी हात उगारला होता. सरकारवाडा पोलिसांत याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणात आमदार कडू यांना त्यावेळी पोलिसांनी ताब्यात घेतले होते. नाशिक महापालिकेत अपंगांसाठी असलेला तीन टक्के राखीव निधी खर्च न केल्यामुळे झालेल्या वादात आमदार कडू आयुक्तांवर संतप्त झाले होते. कडू यांनी आयुक्तांबरोबरच अधिकाऱ्यांनाही शिवीगाळ केली होती. या प्रकरणी तत्कालीन महापालिका आयुक्त कृष्णा यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्याने कडू यांच्यावर गुन्हा दाखल झाला होता.



प्रहार संघटनेच्या वतीने २०१७ साली नाशिक महानगरपालिकेत आंदोलन करण्यात आलं होतं या आंदोलनाला स्वतः बच्चू कडू आले होते. दिव्यांगांच्या प्रश्नावरती आयुक्त आणि बच्चू कडू यांच्यात चर्चा चालू असताना वाद झाला होता. त्यावेळी त्यांनी आयुक्तांवर हात उगारण्याचा प्रयत्न केला होता. याच आंदोलनानंतर बच्चू कडू यांच्यावरती नाशिकच्या सरकार वाडा पोलीस ठाण्यात महापालिका प्रशासनाकडून तक्रार देण्यात आली होती आणि त्यानंतर २०१७ पासून नाशिकच्या सत्र न्यायालय सुनावणी सुरू होती. त्या सुनावणीवर आज निकाल लागला.

## आठ हजार हेक्टर जमीन केली क्षारपडमुक्त,नापीक जमीन झाली पिकाऊ

### दत्त शिरोळ पॅटर्नला मोठे यश

✔ कोल्हापूर/वृत्तसंस्था

पाण्याच्या अतिरेकी वापराने क्षारपड होऊन नापीक झालेले तब्बल आठ हजार हेक्टर जमीन पुन्हा पिकाऊ करण्याचा प्रयोग शिरोळ तालुक्यात यशस्वी झाला. पंचवीस हजार हेक्टर जमिनीचे वाळवंट झाल्याने हादरून गेलेल्या शेतकऱ्यांच्या जीवनात आशेचा नवा किरण निर्माण झाला आहे. शिरोळच्या दत्त पॅटर्न ने या तालुक्याच्या शेती उत्पन्नाच्या उलाढालीत हजार कोटींपेक्षा अधिक वाढ झाली आहे. महाराष्ट्रातील हा सच्छिद्र बंदिस्त निचरा प्रणालीचा पहिलाच प्रयोग आहे.

पाण्याचा आणि रासायनिक खतांचा अतिरिक्त वापर तसेच तीच ती पिके सतत घेतली जात असल्याने क्षारपड जमिनींचे प्रमाण वाढत आहे. देशात ६.३ दशलक्ष हेक्टर जमीन यामुळे नापीक झाली. त्यातील केवळ ७० हजार हेक्टर जमीन विविध प्रयोगाने सुपीक करण्यात आली. महाराष्ट्रात हे प्रमाण ६ लाख हेक्टर असून त्यातील साडे पाच हजार हेक्टरवर कृत्रिम निचरा प्रकल्प राबविण्यात आले. केवळ शिरोळ तालुक्यात २५ हजार हेक्टर जमीन नापीक झाले होते. यामुळे तालुक्यात वर्षाला हजार कोटींची शेती उत्पन्नाची उलाढाल ठप्प झाली होती. नापीक जमिनीमुळे गेल्या तीस वर्षापासून शेतकरी हवालदिल झाला होता, त्याच्यावर मजुरी करण्याची वेळ आली होती.

शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी नापीक जमिनी पुन्हा पिकाऊ करण्याचे पाऊल दत्त साखर कारखान्याने उचलले. कारखान्याचे अध्यक्ष उद्यान पंडित गणपतराव पाटील यांचीच ही कल्पना. त्यांच्याच पुढाकाराने सच्छिद्र कृत्रिम निचरा प्रकल्पाची सुरुवात झाली. त्यासाठी त्यांनी शेतकऱ्यांना एकत्र केले. त्यांचे प्रबोधन केले. त्यासाठी येणारा खर्च शेतकऱ्यांना पेलवणारा नव्हता. तेव्हा उदगाव जयसिंगपूर अर्बन बँकेने मदतीचा हात पुढे केला.

प्रारंभी बुबनाळ गावात केवळ १५० एकर जमिनीवर हा सामूहिक प्रकल्प राबविण्यात आला. तो यशस्वी झाल्याचे लक्षात येताच शेतकऱ्यांकडून प्रतिसाद मिळू लागला. त्यानंतर गावागावात क्षारपड जमीन सुधारणा सहकारी संस्था निर्माण झाल्या. शेतकऱ्यांनी एकत्र येऊन हा प्रकल्प राबविण्यास सुरुवात केली. यातून बघता बघता तीन वर्षात तब्बल आठ हजार हेक्टर जमीन पिकाऊ करण्यात आली. ज्या जमिनीत काटेरी झुडपेच उगवावयची तेथे आता उसासह सर्व पिके शेतकरी घेत आहेत, काही जमिनींत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट वाढले आहे. यामुळे वार्षिक हजार कोटींची उलाढाल वाढली आहे.

## मुलींचे बालविवाह रोखण्यासाठी नागरिकांनी समोर यावे : सनगल्ले

✔ सुराज्य/अक्कलकोट




बालविवाह प्रतिबंधक कायदा ही काळाची गरज असून, मुलींचे बालविवाह रोखण्यासाठी प्रत्येक नागरिक समोर आला पाहिजे, असे प्रतिपादन वळसंग पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक अनिल सनगल्ले यांनी केले.

ग्रामपंचायत कार्यालय आचेगाव, जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा आचेगाव, श्री शावरसिद्ध हायस्कूल आचेगाव आणि गावातील सर्व महिला बचत गटाच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न झाला.यावेळी उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी गावातील कर्तबगार महिलांचा सन्मान करण्यात आला.गावच्या प्रथम नागरिक सरपंच विश्रांती पाटील यांनी उपस्थित भगिनींना शुभेच्छा देऊन जागतिक महिला दिनाचे महत्त्व सांगितले.दक्षिण सोलापूर भाजपा तालुका महिला अध्यक्ष अंबिका पाटील यांनी मनोगत व्यक्त करून उपस्थितांची मने जिंकली.

वळसंग पोलीस स्टेशनचे एपीआय अनिल सनगल्ले यांची या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती.

श्री शावरसिद्ध हायस्कूलचे सहशिक्षक शावरसिद्ध पाटील यांनी प्रत्येक महिलेने आपल्या घरी शौचालयाचा वापर करावा उघड्यावर कोणीही शौचालयात जाऊ नये अशी विनंती केली. कार्यक्रमाची सांगता महिलांच्या मनोरंजनात्मक खेळाने झाली. या कार्यक्रमास ग्रामपंचायतीच्या सर्व महिला सभासद, गावातील बहुसंख्य महिला भगिनी व संजना कोरे ,सोनाली पाटील, रमा येलगुंडे आदी उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षिका प्रतिभा दुधगी यांनी केले तर गीता वाघमोडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



## उत्कर्ष, रामानुज अबॅकस ॲकॅडमीतील विद्यार्थ्यांचे यश

✔ **सोलापूर** : विजापूर रोड येथे आयोजित राज्यस्तरीय किड्स अबॅकस स्पर्धेत सोलापूर येथील उत्कर्ष अबॅकस अकॅडमी व रामानुज अबॅकस अकॅडमीतील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक चि.समर्थ श्रीधर वारकड द्वितीय क्रमांक समृद्धी माळी व तृतीय क्रमांक शौर्य बुवा यांनी पटकावले तसेच कॉन्सलेशन पारितोषिक हर्षदा रायकर समृद्धी श्रीधर वारकड व श्रावणी देशपांडे यांनी प्राप्त केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी. योगेश शंकर कैंगाडे होते. तसेच प्रमूख पाहुणे म्हणून माजी नगरसेवीका मंदाकिनी तोडकरी व संतोष अहिरसंग हे उपस्थित होते. स्मार्ट किड्सचे सहाय्यीक स्वाती कोरडे, दिपाली निकम , कविता सावंत यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले. उत्कर्ष, व रामानुज, अबॅकस अकॅडमीच्या शिक्षिका दिप्ती पवार व अश्विनी गोंडाळ यांना बेस्ट फ्रेंचसीज अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले.

## दीड दिवसांचा वैष्णव मेळावा

✔ **मोडनिंब** : मोडनिंब येथील हरिभक्त परायण कै. गणपत रामा सुरवसे यांच्या पुण्य स्मरनानिमित्त व संत श्रीपाद बाबा व संत रामदास बाबा यांच्या कृपाशिर्वादाने व ह.भ.प. गुरुवर्य ब्रम्ह मुर्ती चंद्रहार महाराज जाधव मोडनिंब यांच्या मार्ग दर्शनाखाली दिड दिवशीय वैष्णव मेळावा संपन्न झाला. त्यामध्ये मेळाव्याचे उद्घाटन दुपारी चार वाजता उपस्थित राजकीय, सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांचे हस्ते संपन्न झाले. त्यानंतर प्रवचने तसेच माऊलीचा हरिपाठ झाला व सायंकाळी ह.भ.प. गुरुवर्य चंद्रहार महाराज जाधव मोडनिंब यांचे सुश्राव्य असे हरिकिर्तन संपन्न झाले तसेच दुसऱ्या दिवशी सकाळी काल्याचे किर्तन ह.भ.प. संपत महाराज हांडे मुंबई यांचे संपन्न झाले त्यानंतर महाप्रसाद झाला. या मेळाव्या साठी सोलापूर जिल्हातील मोडनिंब, जाधवाडी, बैरागवाडी, जाधवाडी, ढेकळेवाडी, कुरुल, कामठी, शिरबावी, सांगोला, धायटि, हल दहिवडी, पेनूर, खरातवाडी, करकंब येथील संत श्रीपाद बाबांचे हरिभक्त अनुयायी उपस्थित होते हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी सुरवसे परिवार व लादे वस्ती वरील भाविक भक्तांनी अथक परिश्रम घेतले.

## महिला दिनी जागतिक बदलानुसार विचारमंथनाची गरज : डॉ. काळे

### श्रमिक पत्रकार संघातर्फे माध्यमातील महिलांचा झाला सन्मान

✔ सुराज्य/सोलापूर

महिला दिन हा सण उत्सव असल्यासारखे साजरा होतो; परंतु या दिवशी आपण आपली बलस्थाने ओळखून जागतिक बदलानुसार विचारमंथन करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन पोलीस उपायुक्त डॉ. दीपाली काळे यांनी येथे केले.

बुधवारी, जागतिक महिला दिनानिमित्त सोलापूर श्रमिक पत्रकार संघातर्फे वृत्तपत्र व इलेक्ट्रॉनिक माध्यमात काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी डॉ. काळे बोलत होत्या. याप्रसंगी विचारमंचावर डॉ. वैशंपायन वैद्यकीय महाविद्यालयातील वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. अग्रजा वरेरकर - चिटणीस, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार शरीफ सय्यद, क्राईम रिपोर्टर असोसिएशनचे अध्यक्ष अनिल कदम आदींची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. काळे म्हणाल्या, आज समाजात स्त्री-पुरुष समानतेची गरज आहे. विभिन्न लिंग असले तरी दर्जाची समानता महत्त्वाची आहे. महिला दिन हा एक सणच असल्यासारखे वाटत आहे; परंतु या दिवशी आपण आपली बलस्थाने ओळखून जागतिक बदलानुसार विचारमंथन करण्याची गरज आहे. आमची बलस्थाने पुढे न्यायची असेल तर राष्ट्राला संपन्न बनविण्याची जबाबदारी आमच्या महिलांच्या आहे, असे डॉ. काळे म्हणाल्या.



यावेळी डॉ. वरेरकर - चिटणीस म्हणाल्या, आज महिला सर्व क्षेत्रात आघाडीवर आहेत; परंतु आजही ग्रामीण भागात मुलींना चांगले शिक्षण मिळत नाही. त्यासाठी मुलींना शिक्षण देणे गरजेचे आहे व त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे हेही महत्त्वाचे आहे. महिलांनी शारीरिक व मानसिक आरोग्य जपणे गरजेचे आहे. बालविवाहसारख्या समस्या आजही समाजात भेडसावत आहेत. समाजाची मानसिकता अद्यापही बदलली नाही. महिलांनी हिमोग्लोबिन व अन्य चाचण्या करून घेतल्या पाहिजे. व्यायाम,ध्यान योगा आणि आहार याकडे लक्ष देण्याची गरज आहे, अशी अपेक्षाही डॉ. वरेरकर - चिटणीस यांनी व्यक्त केली. प्रास्ताविक श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी केले.

आभार खजिनदार शरीफ सय्यद यांनी मानले. सूत्रसंचालन किरण बनसोडे यांनी केले. यावेळी प्राथमिक स्वरूपात सत्कारमूर्तींनी मनोगत व्यक्त केले.

## धुळवडच्या कार्यक्रमात दोन गटात काठी आणि दगडाने हाणामारी

✔ सुराज्य/सोलापूर

धुळवडीच्या कार्यक्रमात मद्य प्राशन करून दोन गटात काठी आणि दगडाने झालेल्या मारहाणीत महिलेसह पाच जण जखमी झाले. ही घटना केगाव येथील शिवाजीनगर तांडा येथे मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली. सर्व जखमींना उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

सुनील फुलचंद राठोड (वय ३५) त्याचा भाऊ सागर राठोड (वय ३०) आणि पूजा गणेश राठोड (वय ३० सर्व रा.केगाव,शिवाजीनगर तांडा) अशी पहिल्या गटातील जखमींची नावे आहेत. काल रात्री आठ वाजेच्या सुमारास धुळवळीच्या कार्यक्रमात मद्य प्राशन करून त्यांना आकाश राठोड, गोविंद राठोड, प्रकाश राठोड यांच्यासह ७ ते ८ जणांनी काठी आणि दगडाने मारहाण केली. तर दुसऱ्या गटातील आकाश धोंडीराम राठोड (वय २८) त्याचा भाऊ गोविंद राठोड (वय ३० रा. केगाव तांडा) हे दोघे जखमी झाले. त्यांना धुळवडीच्या कार्यक्रमात धक्का लागल्याच्या कारणावरून सागर राठोड, सुनील राठोड आणि अन्य ५ ते ६ जणांनी मिळून दगड आणि काठीने मारहाण केली. अशी नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे.



## झेडपीच्या समाज कल्याण कार्यालयात जागतिक महिला दिन साजरा

✔ सुराज्य/सोलापूर

दि. ८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमीतकर यांच्या हस्ते भेटवस्तू देऊन करण्यात आला.

सदर प्रसंगी जिल्हा समाज कल्याण अधिकारी म्हणाले महिला या सर्व क्षेत्रात सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहेत त्या कोणत्याही क्षेत्रात मागे नाही नाहीत त्या पुरुषाच्या बरोबरीने कार्यरत आहेत याप्रसंगी समाज कल्याण विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या स्वाती गायकवाड विस्तार अधिकारी, मोनिका हिरेमठ वरिष्ठ लिपिक, एस एस सुतार कनिष्ठ सहाय्यक, एन आर ढाळजी कनिष्ठ सहाय्यक व जी एस राठोड परिचर या महिला कर्मचाऱ्यांचा भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला महिलाबाबत श्री सचिदानंद बांगर, श्री अतुल मुकटे, शशिकांत ढेकळे यांनी मनोगत व्यक्त केले सदर कार्यक्रमाची प्रस्तावना श्री शीतल कंदलगावकर यांनी केली श्री सावळा काळे यांनी कार्यक्रमाच्या शेवटी आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## हिसका मारून मोबाईल चोरून नेणाऱ्या तरुणास अटक

✔ **सोलापूर** : मायलेकी गाडीवरून घराकडे जात असताना संध्याकाळचा अंधाराचा फायदा घेत पाठीमागून आलेल्या अज्ञात युवकाने हिसका मारून चालत्या गाडीवरून मोबाईल चोरून नेला होता.शहर गुन्हे शाखेने तपास करत या चोरट्याला जेरबंद केले.

याबाबत मिळालेली माहिती अशी की,दि.६ मार्च रोजी सायंकाळी आठ वाजण्याच्या सुमारास प्रिती प्रेमनाथ शिंदे या त्यांच्या मुलीसह मोटरसायकल वरून माशाळ वस्ती ते राजस्व नगर दिशेने घराकडे चालल्या होत्या.तेव्हा मुलगी हेमा ही मोटरसायकल चालवत होती. आणि प्रिती शिंदे या गाडीवर मागे बसलेल्या होत्या.त्यावेळी प्रिती शिंदे यांचे हातामध्ये सॅमसंग कंपनीचा मोबाईल व त्या मोबाईल कव्हर मध्ये रोख ३ हजार रक्कम होती. त्या दोघीही मोटरसायकलवरून जात असताना,माशाळ वस्ती ते राजस्व नगर दरम्यान एका अज्ञात व्यक्तीने त्यांच्या पाठीमागुन मोटरसायकलवरून येऊन,प्रिती शिंदे यांचे हातातील मोबाईल जबरीने हिसका हून चोरून घेऊन गेला होता. शहर गुन्हे शाखेचे पथक या गुह्याचा समांतर तपास करीत असताना,स.पो.नि.संजय क्षिरसागर यांना मिळालेल्या माहितीवरून शहरात मोबाईलची जबरी चोरी करणारा इसम रोहीत पंडीत हत्तुरे हा चोरीचे मोबाईल विक्री करण्यासाठी रंगभवन येथे येणार आहे.असे समजल्यावर त्या ठिकाणी सापळा रचून रोहीत पंडीत हत्तुरे (वय-२४, व्यवसाय मजुरी,रा.सेटलमेंन्ट फ्रि कॉलनी नंबर- ०२), सोलापूर यास ताब्यात घेतले.त्यावेळी त्याची अंगझडती घेतली असता,त्याच्या जवळ तीन मोबाईल मिळुन आले.

# चार वर्षांपासून छावणी चालकांचे ३८ कोटी रुपये अडकले

## प्रस्तावाला मिळेना मुहुर्त; छावणी चालकांचा आत्मदहनाचा इशारा

✔ सुराज्य/सोलापूर

**सांगोला-मंगळवेढा तालुक्यातील चारा छावणी चालक ३८ कोटीच्या बिलासाठी गेली चार वर्ष हेलपाटे मारत आहेत. जिल्हाधिकाऱ्यांची स्वाक्षरी नसल्याने शासनाकडे प्रस्ताव सादर केला गेला नसल्याची माहिती पुढे येत आहे. यामुळे छावणी चालक हवालदिल झाले आहेत. बुधवारी छावणी चालकांनी जिल्हाधिकारी कार्यालय गाठले मात्र एकही अधिकारी त्यांना भेटला नाही त्यामुळे वैतागलेल्या छावणी चालकांनी आत्मदहनाचा इशारा दिला आहे.**

सन २०१९ मध्ये निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थिती मध्ये पशुधन जगवण्यासाठी जिल्ह्यात चार छावणी उभारण्यास मान्यता दिली. त्यानुसार सांगोला मंगळवेढा आणि मोहोळ सह इतर चार तालुक्यातील चारा छावण्या उभारण्यात आल्या पशुचालकांना देण्यात आलेल्या सुविधा योग्य आहेत का? आहार वेळ दिला जातो का? पिण्याची पाणी आणि इतर सुविधांची तपासणी करण्यासाठी अधिकार जिल्हाप्रशासनाकडे दिले होते. दुष्काळी परिस्थिती शांत झाल्यानंतर प्रशासनातील अधिकारी जागे झाले छावण्या बंद करण्याच्या वेळी बिलाचे प्रस्ताव दाखल झाल्यानंतर तपासणी करत दंडाच्या नोटिसा दिल्या

उशिरा प्रशासनाने बंद करण्याच्या वेळी दंडाच्या नोटीस दिल्या यामध्ये चालकांस म्हणणे जाणून घेतले नाही त्यामुळे बिलाचे प्रस्ताव रखडले यासाठी गेली चार वर्ष झाले जिल्हाप्रशासनाकडे हे चारा छावणी चालक हेलपाटे मारत आहे. मात्र यांना कोणी दाद देत नाहीत त्यामुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांनी बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात एकत्र आले मात्र एक ही अधिकारी जागेवर नसल्याने वैतागलेल्या या छावणी चालकांनी आत्मदहन करण्याचा इशारा दिला.




**छावणी चालक दंडाच्या कारवाईस पात्र आहेत असे नोटीसमध्ये म्हटले आहे. याला उशिरा तपासणी करणारे शासकीय कर्मचारी तितके जबाबदार का नाहीत? असा प्रश्न छावणी चालकांना पडला आहे. शासकीय अधिकाऱ्याला वाचवण्यासाठी छावणी चालकाचा बळी देण्याचा प्रयत्न प्रशासनातून केला जात असल्याचा आरोप या छावणी चालकांनी केला आहे.**

**गेली चार वर्ष झाले बिलासाठी तात्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महाविकास आघाडीच्या सरकारच्या काळात पाठपुरावा केला मात्र दखल घेतली नाही आणि शिंदे-फडणवीस सरकारमधील सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला मात्र पालकमंत्र्यांनी वेळ दिला नसल्याने नाराजी व्यक्त केली.**

**जिल्हा प्रशासनाकडून प्रस्ताव शासनाकडे गेलाच नाही यावर जिल्हाधिकाऱ्यांची अद्याप स्वाक्षरी झाली नसल्याचे सांगण्यात येते. ही बिले कोणाच्या सांगण्यावरून थांबली का? मोठ्या प्रमाणात कर्ज काढून सोने, घाण ठेवून, शेती विकून या चारा छावणी उघडल्या जनावरांना जगवलं मात्र शासनाच्या लालपट्टीच्या कारभारात ही सर्व बिल अडकले असल्याने आत्महत्या करण्याची वेळ आली असल्याचे दर्द भरी कहाणी छावणी चालकांनी निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांच्याकडे सांगितली.**

---



## नांदणी टोल नाक्यावर
## २१ लाखांची सुगंधी तंबाखू जप्त

✔ **दक्षिण सोलापूर** : नांदणी टोलनाका येथे बेकायदेशीरित्या ट्रक पकडून त्याची पाहणी केली असता त्यात प्रतिबंधित पान मसाला व प्रतिबंधित सुंगधी तंबाकू आणि गुटख्याची वाहतूक करणारा ट्रक अन्न व औषध प्रशासन विभागाने पकडला.याबाबत मंद्रूप पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका ट्रकमध्ये गुटखा असून सदरचा ट्रक विजयपूरहुन सोलापुरकडे येत आहे. त्या माहितीनुसार अन्न व औषध प्रशासनाचे कुचेकर व त्यांच्या टीमने नांदणी टोलनाका येथे सापळा लावून सदरचा ट्रक पकडून त्याची पाहणी केली त्यात प्रतिबंधित पान मसाला व प्रतिबंधित सुगंधी तंबाखू मिळून आला. प्रतिबंधित पान मसाला, प्रतिबंधित सुगंधी तंबाखू, ट्रक, मोबाईल असा एकून ४१ लाख ५८ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून मंद्रूप पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल झाला आहे. औरंगाबाद येथील सदर प्रतिबंधित हिरा पानमसाला व सुगंधित तंबाखू मालाचा खरेदीदार हा औरंगाबादहून अटकपूर्व जामीन घेण्यासाठी सोलापूर येथे येणार असल्याची माहिती या गुन्ह्याचे तपासी अधिकारी मंद्रूप पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांना मिळाली. त्यापूर्वीच सपोनि रवींद्र मांजरे यांनी तात्काळ स्थानिक गुन्हे शाखेच्या तांत्रिक टीमची मदत घेऊन खरेदीदार आरोपींचा पाठलाग करून फक्त आरोपीच्या मोबाईल नंबरच्या आधारे सोलापुरातून ताब्यात घेतले. ही कामगिरी सपोनि मांजरे, हवालदार मोरे, पोलीस कर्मचारी लखन पवार, स्थानिक गुन्हे शाखेचे हवालदार मोहन मनसावले, धनाजी गाडे यांनी बजावली. सदर गुन्ह्याचा अधिकचा तपास पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक,हिंमत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली मंद्रुप पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि रवींद्र मांजरे करीत आहेत.

## उजनीतून १४ लाखांची
## १२० झाडे गांज्याची झाडे जप्त

✔ **कुर्डूवाडी** : उजनी (मा) येथे कलिंगडाच्या शेतामध्ये १४ लाख ३२ हजार रुपयांची १२० गांजाची झाडे वजन १४१ कि.ग्रॅ जप्त केले आहे. ही कारवाई अंम्ली पदार्थ विरोधी कायद्यांतर्गत ७ मार्च रोजी उजनी (मा) ता. माढा येथील अभिमान विठ्ठल लोकरे वय ५५ यांच्या शेतामध्ये कारवाई करण्यात आली. आरोपीला अटक करून माढा न्यायालया उभे केले असता दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. धुलीवंदन सणानिमित्त पोलिस पेट्रोलिंग करत होते. त्यांना अभिमान लोकरे यांच्या कलिंगडाच्या शेतामध्ये गांजाची झाडे असल्याची माहिती मिळाली. पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधिक्षक हिम्मत जाधव, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक गोपाळ पवार, पो.उप.निरीक्षक हनुमंत वाघमारे, पो.हे. पाटील, पो.ना.कांबळे, पो.ना. शिंदे, ठोंगे, पवार, पो.शि चाकणे शेती जाऊन १२० गंज्याची झाडे वजन १४१ कि.ग्रॅ वजनाची १४ लाख ३२ हजार रुपयांची झाडे जप्त केली आहेत. गांजाची झाडे जप्त करण्याची माढा तालुक्यातील पहिलीच मोठी घटना आहे.

## बेलाटी येथे बाळूमामांच्या
## भंडारा उत्सवाचे आयोजन

✔ **उत्तर सोलापूर** : उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी येथे दिनांक १२ ते १४ मार्च दरम्यान भंडारा उत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संत बाळूमामा मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीराम पाटील बेलाटी कर यांनी पत्रकार परिषदेत दिली. रविवारी १९ मार्च रोजी या उत्सवाचा महाप्रसाद वाटप समाप्ती होणार आहे. यामध्ये नित्यनेमाने दररोज सकाळी दहा ते दोन वाजेपर्यंत भजन, दुपारी दोन ते पाच धनगरी ओव्या, सायंकाळी पाच ते सहा बाळूमामाच्या पालखीची मिरवणूक होणार आहे. नेहमीप्रमाणे दररोज सायंकाळी सहा वाजता बाळूमामांची आरती होईल. याचबरोबर वृक्षारोपण रक्तदान हे सामाजिक उपक्रम यावेळी राबविण्यात येणार आहेत मंगळवार, २२ मार्च रोजी गुढीपाडवा असल्याने दिवसभर कार्यक्रम व महाप्रसादाचे वाटप कार्यक्रम होणार आहे .

## किरकोळ कारणावरून मारहाण

✔ **सोलापूर** : किरकोळ कारणावरून तरुणास हाताने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याप्रकरणी ११ जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.७ मार्च रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या दरम्यान शिवाजीनगर तांडा येथे घडली.याप्रकरणी आकाश धोंडीबा राठोड (वय-२९,रा. शिवाजीनगर तांडा) याने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्याच्या फिर्यादीवरून किरण चव्हाण सागर राठोड सुनील राठोड व त्यांच्या चार बहिणी व चार पती (नाव पत्ता माहित नाही) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोसई भोईटे हे करीत आहेत.

---



## हिप्परगा तलावातील पाण्याचे पूजन

✔ सुराज्य/सोलापूर

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कॉ.गोदूताई परुळेकर महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या वतीने जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत कॉ.गोदूताई परुळेकर नगरला वाढीव पाणीपुरवठा योजनेचे पाणीपूजन व पायाभरणी कार्यक्रम संस्थेचे चेअरमन कॉ.सुनंदा बल्ला यांच्या अध्यक्षतेखाली तळे हिप्परगा येथील शासकिय विश्रामगृहाच्या प्रांगणात पार पडला.

यावेळी माजी आ.आडम मास्तर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ॲड.एम.एच. शेख, कामिनी आडम, नसीमा शेख, युसूफ शेख मेजर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यकारी अभियंता उमाकांत माशाळे, युनूस चौधरी, राजू पाटील, राहुल वाघचवरे, विल्यम ससाणे, सुनंदा बल्ला, फातिमा बेग, शकुंतला पाणिभाते, लिंगव्वा सोलापूरे, शेवंताताई देशमुख, विक्रम कलबुर्गी, वसीम मुल्ला, सिद्धप्पा कलशेट्टी, गजेंद्र दंडी, ॲड. अनिल वासम आदींची उपस्थिती होती. यावेळी आडम मास्तर, अँड.शेख, नसीमा शेख, नलिनीताई कलबुर्गी, कामिनीताई आडम, कलशेट्टी आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रास्तविक युसुफ शेख मेजर यांनी केले. सूत्रसंचालन व आभार अँड.अनिल वासम यांनी केले.

---

# मोबदला न मिळाल्याने वेळापूर येथील
# पालखी मार्गात येणारी घरे काढण्यास विरोध

✔ सुराज्य/वेळापूर

वेळापूर येथील उघडेवाडी चौकालगत असणारे चव्हाण व पवार कुटुंबियांची घरे ही पालखी मार्गाच्या कामात येत असून त्यांची नुकसान भरपाई न मिळाल्याने ती घरे काढण्यास सहा कुटुंबांनी तीव्र विरोध केला आहे. वेळप्रसंगी आम्हाला शासनाच्या विरोधात आत्मदहन करावी लागेल असा इशारा वेळापूर ग्रामपंचायतीचे माजी सदस्य गणेश चव्हाण यांनी दिला आहे.

उघडेवाडी चौकालगत पुणे-पंढरपूर रोडवर दक्षिण बाजूस पवार आणि चव्हाण कुटुंबीय यांची गेली ४० ते ५० वर्षापासून बांधीव घरी आहेत. त्यांच्या घराजवळून पंढरपूर पुणे पालखी मार्गे गेल्याने त्या पाच ते सहा बांधीव घरे गेली आहेत. याबाबत गेली दीड वर्षापासून प्रांत अधिकारी अकलुज कार्यालयाकडून रोडमध्ये गेलेल्या लोकांना त्यांचे मोजमाप करून नुकसान भरपाई देण्याचे काम सुरू आहे पण चव्हाण व पवार कुटुंबीय गेली वर्षभरापासून आम्हाला नुकसान भरपाई मिळावी म्हणून प्रांत कार्यालयाकडे पाठपुरावा करीत आहेत पण त्याकडे प्रांत कार्यालय पूर्णपणे दुर्लक्ष करीत आहे. यातच ६ मार्च रोजी प्रांत कार्यालयाने कोणत्याही आदेश अथवा नोटीस न देता दबावाने वरील घरे बांधकामाचा मोबदला न देता घरे काढण्यासाठी पोलीस बंदोबस्त, वेळापूर सर्कल, तलाठी, जीसीपी मशीन घेऊन आले होते. सर्वांनी लगेचच घरे खाली करावी असा आदेश मंडला अधिकारी विलास रणसुंभे यांनी दिला. मात्र

> **योग्य**
> **तो आदेश केल्यास**
> **घरे ताबडतोब काढू**
> प्रतिज्ञापत्र प्रांत अधिकारी, अकलूज यांना देण्यात देण्यात आले असले तरीही नुकसान भरपाई देण्यास प्रांत कार्यालय टाळा टाळ करत आहे. योग्य तो आदेश केल्यास आमची घरे ताबडतोब काढण्यास तयार आहोत असे माजी ग्रामपंचायत सदस्य गणेश चव्हाण यांनी यावेळी सांगितले.

त्यानंतर येथील सर्व कुटुंबांनी आम्ही या ठिकाणी गेली ४० वर्षापासून घरे बांधून राहत आहोत पूर्वी प्रांत अधिकारी अकलूज यांनी ९३ लाख रुपये नुकसान भरपाईची नोटीस दिली होती कालांतराने आमच्या गटा लगत जागेची मोजणी झाली असता आमची बांधकामे आमच्या गटात न येता फक्त दहा फूट नातलगाच्या जागेत गेल्यावरून पुन्हा प्रांताधिकारी अकलुज



यांनी नोटीस काढून येतील चव्हाण, पवार या कुटुंबीयांना पैसे देता येत नाहीत अशी नोटीस काढली आहे.

परंतु या जागेचे मालक हे चव्हाण यांचे मामा असल्याने त्यांनी या बांधकामाचे पैसे चव्हाण व पवार परिवारांना देण्यात यावेत माझे नातलग आहेत ते या ठिकाणी गेले ४० ते ५० वर्षापासून राहत असून त्यांच्या बाबत माझी कोणतीही तक्रार नाही यांना नुकसान भरपाई देण्यात यावी, माझी कसलीही तक्रार नाही असे प्रतिज्ञापत्र करून दिले आहे. मात्र त्यावर निर्णय झाला नाही.

---

## बसवेश्वर स्मारक समितीच्या अध्यक्षपदी मनीष काळजे

✔ **सोलापूर** : महात्मा बसेश्वर महाराज स्मारक समितीची शासकिय विश्रामगृह येथे संपन्न झाली. महात्मा बसवेश्वर स्मारक समितीच्या अध्यक्षपदी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मनीष काळजे यांची निवड करण्यात आली. अध्यक्षस्थानी स्वामी समर्थ सूतगिरणीचे चेअरमन राजशेखर शिवदारे होते.

या बैठकीमध्ये बसवेश्वर महाराज यांचे भव्य दिव्य स्मारक बसवेश्वर सर्कल कोंतम चौक येथे बसवकालीन शरण व शरणी यांच्या भित्तीशिल्पासह व्हावे यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून विशेष निधी मिळवण्यासाठी प्रयत्न करणे, व त्याचबरोबर महात्मा बसवेश्वर महाराज जयंती २२ एप्रिल रोजी होणार आहे.त्या अनुषंगाने २२ एप्रिल रोजी रात्री बारावाजेपर्यंत ध्वनिक्षेपक वापरामध्ये सूट मिळण्याकरिता शासन दरबारी प्रयत्न करणे, या दोन्ही विषयांचा पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

याप्रसंगी राजशेखर शिवदारे, विश्वनाथ चाकोते, सुधीर खराटमल, जगदीश पाटील, महादेव कोगनुरे, रेवणसिद्ध आवजे, बसवराज सावळगी, गणेश चिंचोली, सारणे मामा, आनंद मुस्तारे, सचिन शिवशक्ती, शिवराज झुंजे, मल्लिनाथ सोलापूरे आदी उपस्थित होते. समितीचे अध्यक्ष मनीष काळजे व सदस्य म्हणून योगेश जम्मा, गौरव जक्कापुरे, आकाश हारकुड, ईश्वर हिरेमठ, किरण तोळनुर, महेश जेऊर,राजशेखर बिराजदार-पाटील, आदित्य पुरवंत, सुमित शिंगारे, आकाश मकाई, अशितोष वाले आदित्य म्हमाणे यांची निवड करण्यात आहे.




**मुख्यमंत्र्यांकडून एक कोटीचा निधी आणू**

महात्म बसवेश्वरांच्या स्मारकासाठी आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्याशी चर्चा केली आहे. हे स्मारक राज्यात भव्यदिव्य करण्याचा मानस आहे. याबाबत मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करत एक कोटी रूपयांचा निधी आणू, असे आश्वासन जिल्हाप्रमुख मनिष काळजे यांनी दिले.

## जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करत केली दगडफेक

✔ **सोलापूर** : जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करत दगडफेक केल्याप्रकरणी २६ जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.६ मार्च रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास नूर ए दरी या मज्जिद जवळील ए ग्रुप जुना विडी घरकुल येथे घडली. प्रेम पुला, व्यंकटेश मुशण, विनायक गवळी, ओंकार नराल, निरंजन भिमनपल्ली, अक्षय अन्नम, सोन्या वग्गु,महेश कोडम,विशाल घाडगे, विशाल चंदनशिवे, आर्यन, लुकमान बागवान, नोमान बागवान, सुफियान बागवान, इरफान चुडगुंपी,शाहिद बागवान, माज पेरमपल्ली, अंपाल यांच्यासह इतर सात ते आठ अनोळखी इस्मान विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.वरील संशयित आरोपींनी पोलीस आयुक्त सोलापूर शहर यांच्या जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करून बेकायद्याची मंडळी जमवून त्या ठिकाणी एकमेकांना लाथा बुक्क्यांनी मारहाण करून एकमेकांवर दगड भिरकावून परिसरातील कायदा व सुव्यवस्था बिघडवली आहे. अशा आशयाची फिर्याद पो.हे.कॉ. सुभाष चव्हाण यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे.

---

# जि.प. शाळेतील २३० मुलींना सायकल वाटप

## महिला दिनी महापालिकेचा उपक्रम

✔ सुराज्य/सोलापूर

महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या प्रयत्नातून महापालिका शाळेतील २३० विद्यार्थिनींना महिला दिनानिमित्त सायकलची अनोखी भेट देण्यात आली. यामुळे या विद्यार्थिनींचा शाळेचा प्रवास सुखकर झाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर हास्य खुलले होते.

महिला दिनानिमित्त सोलापूर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभाग व महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमांत महापालिका शाळेतील इयत्ता आठवी आणि नववीत शिकणाऱ्या २३० विद्यार्थिनींना सकाळी कॅम्प शाळेत खा. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी यांच्या हस्ते आणि महापालिकेचे आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या प्रमुख उपस्थितीत सायकल वाटप करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त विद्या पोळ,उपायुक्त मच्छिंद्र घोलप, सहाय्यक आयुक्त पुष्पगंधा भगत, प्रशासन अधिकारी हनुमंत जाधवर, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी विठ्ठल कस्तुरे, पंजाब नॅशनल बँकेचे देवेंद्र सिंह, मंजुनाथ कुलकर, ईशावली पिंजारी, नितीन शिंदे, अभिजीत इलग, कोटक महिंद्रा बँकेचे व्यवस्थापक विशाल सूर्यगंध, संजय भुके, पवन भुसपुटे, मल्लेश नराल आदी उपस्थित होते.

सर्व विद्यार्थिनींना फेटे बांधून सन्मानित करून या सायकल प्रदान करण्यात आल्या. त्यानंतर महापालिकेच्या सर्व शाळेतील आठवी आणि नववीच्या २३० मुलींना सायकल देण्यात आले. आठवी व नववी शिकणाऱ्या मुलींना प्रोत्साहन म्हणून हा उपक्रम घेण्यात देण्यात आला. प्रास्ताविक विठ्ठल कस्तुरे यांनी केले. सूत्रसंचालन गंगा शिंदे व स्नेहा पुजारी यांनी केले. तर आभार रजनी राऊळ यांनी मानले.





**नारीशक्तीचा सन्मान करा : खा.महास्वामी**

नारी ही एक शक्ती आहे. त्यांचा सन्मान केला पाहिजे. अत्यंत स्तुत्य असा सायकल वाटपाचा कार्यक्रम महापालिकेच्या वतीने घेण्यात आला. याबद्दल खा. जय सिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी यांनी महापालिका आयुक्तांचे कौतुक केले.

**याच विद्यार्थिनींतून भविष्यात पालिका आयुक्त होतील : उगले**

महिलांचा सन्मान झाला पाहिजे. त्यांचा सन्मान झाला पाहिजे. त्यांना अधिकार मिळाला पाहिजे. त्यांना प्रगतीमध्ये कोणताही अडथळा येऊ नये, या उद्देशातून सायकल वाटपाचा हा छोटासा प्रयत्न केला आहे. शाळेचा प्रवास सुखकर व्हावा म्हणून हा प्रयत्न केला आहे. पुढील वर्षीच्या महापालिका अंदाजपत्रकातही यासाठी तरतूद केली आहे असे सांगतानाच या विद्यार्थिनींमधून कदाचित आपल्या महापालिकेचा आयुक्तही होऊ शकेल, असा आशावाद महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी व्यक्त केला.

## ... तर मी पर्यायी व्यवस्था करतो: आवताडे

✔ **मंगळवेढा** : निधी आणायला कमी पडणार नाही पण आलेला निधी खर्च करणार नसाल तर विचार करावा लागेल. जर कामच करायचे नसेल तर रजेवर जावा मी पर्यायी व्यवस्था करतो असा इशारा आमदार समाधान आवताडेंनी मुख्याधिकारी यांना दिला.

यावेळी प्रांताधिकारी आप्पासाहेब समिंदर, मुख्याधिकारी निशिकांत प्रचंडराव, शशीकांत चव्हाण, दत्तात्रय जमदाडे, धनजंय खवतोडे, सोमनाथ आवताडे आदी उपस्थित होते. आ. आवातडे यांनी मंजूर निधीतून कामच करणार नसाल दुसऱ्या यंत्रणेच्या नावावर काम टाकून करून घेण्याचा इशारा देत ५० लाखांची संरक्षक भिंत व ५० लाखांची अभ्यासिकेच्या उपयोग काय ? २.५ कोटी निधी देवून ७ महिन्यात अंदाजपत्रक करू शकत नाही यावर खंत व्यक्त करून कृष्ण तलाव सुशोभिकरणाचे २.५ कोटींचा नगरपालिकेच्या ऐवजी अन्य विभागाला देण्याचा निर्णय घेतला.

प्रांताधिकारी आप्पासाहेब समिंदर म्हणाले की, आ. आवताडे हे निधी मिळवतात,कर्मचाऱ्यांनी या मंजूर कामासाठी पळापळ करून खर्च करावा. वर्षभरापासून नगरपालिकेचा कारभार प्रशासकाच्या हातात असल्याने आ.आवताडेनी घेतलेल्या पहिल्याच आढावा बैठकित तक्रारींचा पाऊस पडला.

## आडम मास्तरांसह १८ जण निर्दोष

✔ **सोलापूर** : सरकारी कामात अडथळा केल्याच्या आरोपातून माजी आमदार नरसय्या आडम यांच्यासह १८ जणांना निर्दोष मुक्त करण्याचा आदेश जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही.एच.पाटवदकर यांनी नुकताच दिला आहे. य ८ डिसेंबर २०२० रोजी माकपतर्फे वतीने शासनाने शेतकरी विरोधात काळे कायदे पारित करून शेतकऱ्याला धोक्यात आणले म्हणून मोर्चा काढण्यात आला होता. कार्यकर्त्यांनी रस्त्याच्या मध्ये झोपून रहदारीस अडथळा केला होता. पोलिसांना धक्काबुक्की करून शासकिय कामात अडथळा केला होता. असे सरकार पक्षाचे म्हणणे होते. खटल्यात सरकारतर्फे ४ साक्षीदार तपासण्यात आले. या खटल्यात आरोपींतर्फे ॲड.मिलिंद थोबडे, ॲड.विनोद सूर्यवंशी, ॲड. राजकुमार मात्रे, ॲड.दत्ता गुंड, ॲड. निशांत लोंढे यांनी तर सरकारतर्फे ॲड. दत्तूसिंग पवार यांनी काम पाहिले.